# साईलीला



श्रीसाईबाबा ( समाधी मंदीर )

**श्री साईनाथ वाचनाल**

**श्री साईबाबा संस्थान, शि**

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

जगा लावावें सत्पथी । हेंचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा

**वर्ष ६१ वे )** **किंमत १ रुपया** **( अंक १**

एप्रिल १९८२

## श्रीरामनवमी विशेषांक

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर. मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनी : ४४३३६१

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

जय परब्रह्मा सनातना ।
जय दीनोद्धारा प्रसन्नवदना ।
जय चैतन्य घना भक्ताधीना ।
दे निजदर्शना निजभक्तां ॥ २० ॥

जय जया जी द्वंद्वातीता ।
जय जया जी अव्यक्तव्यक्ता ।
सर्व साक्षी सर्वातीता ।
अकळ अभक्तां सकळिकां ॥ २१ ॥

जय जय भवसंताप हरणा ।
जय जय भवगज विदारणा ।
जय जय आश्रित प्रेमपूर्णा ।
संकट निरसना सद्गुरुराया ॥ २२ ॥

तुज अव्यक्तीं समरसतां ।
आकार पावला निराकारता ।
परी तव भक्त कल्याण कारिता ।
देह ठेवितांही न सरे ॥ २३ ॥

हीं असतां जी जी कृति ।
तोच समरसतां अव्यक्तीं ।
तेच अनुभव आजही भोगिती ।
जे तव भक्तीं लागले ॥ २४ ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४८ वा.

एकसष्ठाव्या वर्षाच्या
प्रथम अंक प्रकाशनीं
संत चूडामणी भगवान
श्रीसाईबाबांचे
आपल्या सर्व भक्तांना,
श्रीसाईलीलाच्या सर्व वाचकांना
सर्व लेखक–कवींना
जाहिरातदार व हितचिंतकांना
अनेकोत्तम शुभाशिष!


— श्रीसाईराम

# या अंकाचे मानकरी


| | |
|---|---|
| १) संपादकीय | – ६१ व्या वर्षात पदार्पण |
| २) शिरडीची रामनवमी | – सदानंद चेंदवणकर |
| ३) परमहंस श्री श्रीधर स्वामी | – |
| ४) षड्रिपु का षडमित्र | – ले. क. मु. ब. निंबाळकर |
| ५) आध्यात्मिक मार्गात नादब्रह्म | – डॉ. रा. सी. कापडी |
| ६) शिरडीचे माणिक... | – डॉ. अ. का. पाठक |
| ७) संत बाबुराव महाराज | – श्री. मधुसूदन करंबेळकर |
| ८) संत श्री दासगणू महाराज | – श्री. मुकुंदराव टेकाडे |
| ९) तुलसीदासांचे रामचरित मानस | – सौ. कुसुमताई जोग |
| १०) तिसऱ्या टप्प्यावरील कर्करोग बरा झाला | – श्री. मनोहरपंत सावंत |
| ११) साईपरिवार वृत्त विशेष | – |
| १२) भारतातील श्रीबाबांची मंदिरे | – |
| १३) डॉ. गव्हाणकर यांची माफी | – |
| १४) साठवर्षाची अशी ही साईलीला | – डॉ. इंदूताई नाईक |
| १५) माफीपत्र | – श्री. एल. बी. माल्वणकर |
| १६) साई मुऱ्हाई | – सौ. लीला मराठे |
| १७) शिरडीत साईराम प्रगटले | – श्री. रघुनाथराव जुन्नरकर |
| १८) माफीपत्र | – श्री. क. हि. काकरे |
| १९) नाम ध्यान महिमा | – श्री. जयवंत कुलकर्णी |
| २०) रामनवमीचा उत्सव | – सौ. वसुंधरा चोरे |
| २१) श्रीसाईलीला-थोरांचे शुभसंदेश | – |
| २२) शिर्डीतील मंगलकार्यालय उद्घाटन सोहळा | – कु. रेखा दिघे |
| २३) शिरडी वृत्त | – जानेवारी १९८२ |

# श्रीसाईबाबांच्या कृपाशिर्वादामुळेच
# एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण

स. न. वि. वि.




श्रीसाईलीला मासिकाचा एकसष्ठाव्या वर्षाचा हा पहिला अंक आहे. श्रीसाईबाबांनी सुरु केलेल्या श्रीरामनवमी उत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजे आज १ एप्रिल रोजी तो प्रकाशित होत आहे हा अगदी विलक्षण योगायोग आहे. श्रीसाईबाबा आपणाला जसे हवे तसे ते करून घेतात याला अनुसरून त्यांनी त्यांच्या साईलीला मासिकाचा हा एकसष्ठीचा पहिला अंक आपल्या उत्सवदिनीच प्रकाशित करून घेतला असेच म्हणावयास हवे. महाराष्ट्रात अध्यात्मिक विषयाला संत विचाराना चालना देणारे वाहिलेले एवढे प्रदीर्घ वाटचाल केलेले असे अन्य मासिक नाही. श्रीसाईबाबांच्या महानिर्वाणानंतर अवघ्या चारच वर्षांनी म्हणजे १९२३ साली हे श्रीसाईलीला मासिक सुरू झाले व आजतागायत ते चालू आहे ही केवळ बाबांचीच कृपा होय. श्रीबाबांच्या परम कृपा प्रसादामुळेच एकसष्ठाव्या वर्षाचा हा पहिला अंक साईभक्त वाचकांच्या हाती देण्यात आम्हाला परम आनंद होत आहे.

“साठी बुद्धिनाठी” ही म्हण कदाचित माणसांच्या बाबतीत खरी असली तरी ती मासिकांच्या बाबतीत खचितच खरी नाही. दीर्घकाळ चालणारे मासिक हे मुरलेल्या लोणच्याप्रमाणे अधिकच चविष्ट असते. मासिकाला एक परंपरा असते आणि दीर्घकाळच्या प्रकाशनाने त्याला एक प्रकारची प्रतिष्ठाही प्राप्त झालेली असते. दीर्घकाळाच्या परंपरेने मासिकाकडून वाचकांच्या बऱ्याच अपेक्षा असतात आणि मग त्या पुऱ्या करण्याचे अत्यंत जबाबदारीचे काम संपादकावर पडत असते. म्हणून अशा प्रकारच्या दीर्घकाळ चाललेल्या व उज्वल परंपरा असणाऱ्या मासिकाचा संपादक होणे हे जसे भाग्याचे त्याचप्रमाणे मोठ्या जबाबदारीचेही काम असते.

आजच्या जगात आपल्याला अनेक प्रकारची नियतकालिके प्रसिद्ध होताना दिसतात. त्यामध्ये दैनिकांपासून वार्षिकापर्यंत सर्वांचा अंतर्भाव होतो. ही नियतकालिके एकाच ध्येयाने अथवा उद्देशाने निघालेली नसतात. आणि त्याचमुळे त्यात छापून येणारा मजकूरही फारच विविध प्रकारचा असतो. दैनिके बातम्यांना प्राधान्य

देतात आणि त्यामुळे त्यात भारदस्त विषयांवरील लेख फारच थोडे येतात. बातमी ही क्षणाक्षणाला ताजी असते, व क्षणाक्षणाला शिळी होते. त्यामुळेच मग सकाळी निघालेले दैनिक दुपारला शिळे होते आणि ताज्या बातम्यांसाठी भुकेलेले वाचक दुपार होताच सायंकाळच्या वर्तमानपत्रांची प्रतीक्षा करू लागतात! अर्ध साप्ताहिके, साप्ताहिके ह्यात बातम्यांना मुळीच स्थान नसते असे नाही त्यामुळे ह्या नियतकालिकातून बातम्या इतकेच महत्व लेखांनाही असते. ह्यानंतर पाक्षिके, मासिके, द्वैमासिके त्रैमासिके, षण्मासिके व वार्षिके ह्यांचा विचार करावा लागतो. ह्या सर्व नियतकालिकातून बातम्यांना अभावानेच स्थान मिळत असते तर वैचारिक लेख व करमणूक प्रधान साहित्य हेच ह्या नियतकालिकातून विशेषेकरून प्रसिद्ध होत असते. ह्या नियतकालिकातून प्रसिद्ध होणाऱ्या लेखांच्या विषयाची विविधताही पहाण्यासारखी असते. राजकीय पक्षांची मुखपत्रे असणारी नियतकालिके पक्षीय राजकारणाचा सतत पुरस्कार करीत असतात. नाटकाला, शेतीला, धंद्याला, सिनेमाला, खेळांना वाङ्मयाला अर्थकारणाला, स्त्रियांच्या प्रश्नांना अशा प्रकारे वाहिलेली मासिके त्या त्या प्रश्नांचा उहापोह करणारे लेख छापीत असतात आणि शेवटी तत्वज्ञान, धर्म, भक्ति अशा विषयांच्या प्रचारासाठी प्रसिद्ध होणारी थोडीशी नियतकालिके असतात आणि त्यांचा खपही असावा तसा फार मोठा नसतो. शिर्डी संस्थानतर्फे प्रसिद्ध होणारे 'श्री साईलीला' मासिक ह्या शेवटच्या वर्गात मोडते, पण त्याचा आता खप वाढू लागला आहे. प्रसार–प्रचार भरपूर होत आहे.

श्री साईलीला मासिकाच्या साठ वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीचा इतिहास मोठा मनोरंजक असला पाहिजे व तो यथावकाश लिहिला जाईलच; पण येथे तो समग्र देता येण्यासारखा नसल्यामुळे ह्या मासिकाचे उद्देश काय होते आणि त्यातले किती सफल झाले ह्याचाच आढावा एकसष्ठाव्या वर्षांत पदार्पण करण्याच्या वेळी करणे इष्ट होईल. श्री साईबाबांनी १९१८ साली समाधी घेतल्यानंतर श्री साईबाबांच्या आशीर्वादाने ज्यांच्या लेखनाला कै. अण्णासाहेब दाभोलकरांनी सुरवात केली होती ते साईसच्चरित लिहून पुरे झाले होते. श्री बाबांच्या संबंधीचे काही भक्तांचे अनुभव त्यात ग्रथित झाले होते; पण बाबांच्या असंख्य भक्तांना हरघडी बाबांच्या लीलांचे, आशीर्वादाचे व कृपेचे अनुभव येत होते व तेही कोठे तरी प्रसिद्ध करून इतर भक्तांच्या माहितीसाठी रुजू करणे आवश्यक होते. त्याकाळी शिर्डी संस्थान विश्वस्तांच्या ताब्यात होते तेव्हा त्यांनी विचार विनिमय करून 'साईलीला' ह्या नावाचे मासिक प्रसिद्ध करण्याचे ठरविले व त्याचा प्रथम अंक चैत्र शुद्ध प्रतीपदा (पाडवा) शके १८४५ (इ. स. १९२३) ला प्रसिद्ध केला! हीच श्री साईलीला मासिकाची सुरवात होय. हा पहिला अंक केवळ बत्तीस पानांचा होता व त्यावर किंमत छापलेली

नव्हती; पण मासिकाची संकल्पित वार्षिक वर्गणी केवळ तीन रुपये सहा आणे (पोस्टेज सह) होती. हा प्रथम अंक सर्वसाधारण त्या काळी माहीत असलेल्या सर्व साईभक्तांना नमुना अंक म्हणून विनामूल्य पाठविण्यात आला होता व त्यांना वर्गणी-दार होण्याची विनंति करण्यात आली होती तसेच पुढील अंक व्ही. पी. ने रवाना होईल असेही कळविण्यात आले होते. ह. भ. प. श्री. लक्ष्मण गणेश उर्फ काका महाजनी ह्यांचे नाव ह्या अंकावर पहिले संपादक म्हणून छापलेले आहे. तर ह. भ. प. रामचंद्र उर्फ बाबासाहेब तर्खड यांनी टर्नर रोड वांद्रे येथून तो प्रकाशित केला.

प्रस्तुतचा श्री साईलीला मासिकाचा पहिला अंक कुणा जुन्या साईभक्ताने जपून ठेवला असल्यास न कळे; परंतु तो शिर्डी संस्थानच्या शिर्डी येथील वाचना-लयात काळजीपूर्वक जपून ठेवण्यात आला व मंदिरप्रमुख श्री. बागवे ह्यांना भेटल्यास ते तो अंक जिज्ञासूना दाखविण्याची व्यवस्था करतील. ज्या वाचकांना तो पहावयाचा असेल त्यांनी तो श्री. बागवे ह्यांच्याकडे जाऊन पहावा. श्री साईलीला मासिक काढ-ण्याचा उद्देश काय होता हे समजून घेण्यासाठी साईलीलेच्या प्रथमांकाकडे दृष्टिक्षेप करणे आवश्यक आहे. ह्या करिता त्या अंकातील समग्र संपादकीयच पुढे उद्धृत करीत आहोत.

## श्रीसाईलीला मासिक

### वर्ष १ चैत्र शके १८४५ (१९२३) अंक पहिला

या मासिक पुस्तकाचा उद्देश त्याच्या नावावरून व्यक्त होत आहे. शिर्डीचे श्री साई महाराजांचे भक्त असंख्य असून ते ठिकठिकाणी पसरले आहेत. त्यांना निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या तऱ्हेचे अनुभव महाराजांनी आपल्या देहावसाना-नंतर सुद्धा अनुभव देण्याचे चालू ठेवले आहे. किंबहुना ज्यांना महाराजांच्या देहाचे प्रत्यक्ष दर्शन घडले नाही त्यांनासुद्धा अनुभव येत आहेत. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे महाराजांचे अनुभव अश्रुतपूर्व, अतर्क्य आणि अनेक आहेत व त्यांच्या अष्टकातील खालील श्लोकांची सत्यता सर्वांना पटवीत चालले आहेत—

अनेका श्रुतातर्क्य लीलाविलासः ।
समाविष्कृतेशा न भास्वत् प्रभावम् ॥
अहं भावहीनो प्रसन्नात्मभावम् ।
नामामीश्वरं सद्गुरूं साईनाथम् ॥ १ ॥

महाराजांच्या सर्व लीलांचा एके ठिकाणी संग्रह होणे शक्य नाही. पण शक्य असेल तेवढा त्यांच्या लीलांचा व त्यांच्या अमूल्य बोध वचनांचा संग्रह करावा, या

हेतूने हे मासिक पुस्तक काढले आहे. भावार्थ रामायणात श्रीरामचंद्राला पार्वतीने 'तू सर्वज्ञ असताना भ्रांतपणाचे अवलंबन करून तृणपाषाणांना आलिंगन का देतोस?" असा प्रश्न केला असता श्रीरामचंद्रांनी जे शब्द उच्चारले आहेत तेच महाराजांना लागू आहेत. श्रीरामचंद्र म्हणाले—

भक्त उद्धारावया कारणे । रडणे पडणे अडखळणे ।
पर्वतों पर्वती धावणे । आणि आलिंगणे वृक्षासी ॥
उमे जाण तू निश्चित । माझे पाऊल न पडे व्यर्थ ।
जाणे सदाशिव समर्थ । तुझा भावार्थ तो नाही ॥

हे शब्द सर्वस्वी महाराजांस लागू आहेत. त्यांचा एकुण एक शब्द व एकुण एक लीला केवळ भक्तांच्या उद्धारासाठी होती, व त्यांचे एक पाऊलसुद्धा व्यर्थ पडत नव्हते. म्हणून त्या लीलांचा व शब्दांचा संग्रह भक्तांनाच नव्हे तर सर्व जनतेला हितकारी होईल अशी आमची खात्री आहे.

असा संग्रह करण्याचा थोडासा प्रयत्न झाला आहे व तो या मासिकात 'महाराजांचे अनुभव' व 'श्रीसाईसच्चरित' या मथळ्याखाली येईल. यापैकी श्रीसाई सच्चरित पद्यात्मक म्हणजे ओवीबद्ध रचले गेले आहे, व त्याची म्हणजे श्रीसाईसच्चरिताची सुरुवात महाराज देहधारी असतांना त्यांची आज्ञा घेऊन झाली होती. 'महाराजांचे अनुभव' या मथळ्याखाली निरनिराळ्या भक्तांकडून जे अनुभव लिहून येतील त्यांचा संग्रह करण्याचे योजिले आहे. असे बरेचसे अनुभव आमच्या संग्रहात आज आहेत ते या मथळ्याखाली छापले जातील. त्यात काही चुका असल्यास त्या त्या भक्ताकडून दुरुस्ती लिहून आल्यास आम्ही आनंदाने प्रसिद्ध करू तसेच महाराजांचे भक्ताकडून जे जे अनुभव लिहून येतील त्यालाही सवडीप्रमाणे शक्य तितके स्थळ या मासिकात देऊ भक्तांचे अनुभव छापण्यासाठीच हे मासिक असल्यामुळे जे अनुभव लिहून येतील तिकडे पूर्ण लक्ष दिले जाईल हे सांगणे नकोच.

समर्थांनी कोणास काही गुप्त रीतीने सांगितले असेल तर ते या ग्रंथात परिस्फुट होण्याचा संभवच नाही. पण त्यांनी उघडे दरबारात सर्वांसमक्ष कोणा एकास उद्देशून जरी काही सांगितले असले तरी ते सर्वांच्या हिताचे असल्यामुळे ते सर्वांची सामाईक कमाई आहे, असे सर्व साईभक्त समजत असले पाहिजेत अशी समजूत आहे आणि म्हणूनच त्यांनी आपले अनुभव लिहून पाठवावे अशी आमची प्रत्येकभक्तास आग्रहाची विनंती आहे.

सारांश, ही सरस्वतीची सेवा आणि ती परम दयाळू श्री साईमाऊलीचे इच्छेने आणि आशीर्वादाने घडत आहे. अर्थात त्या माऊलीची आपल्या भक्तांना वेळोवेळी आठवण होत रहावी हेच या सेवेचे ध्येय आहे.

वर उद्‌धृत केलेल्या संपादकीयावरून असे दिसून येईल की साईलीला मासिक चालू करण्याचे त्यावेळी मुख्य दोन उद्देश होते. एक म्हणजे अण्णासाहेबांनी लिहिलेले साईसच्चरित क्रमशः प्रसिद्ध करणे व श्रीबाबांच्या संबंधीचे भक्तांचे अनुभव प्रसिद्ध करणे. ह्यापैकी साईसचरित प्रस्तुत मासिकात क्रमशः प्रसिद्ध होऊन आता ते ग्रंथरूपाने मिळते तेव्हा तो उद्देश केव्हाच सफल झालेला आहे. भक्तांच्या अनुभवाबद्दल त्यावेळचे संपादक म्हणतात, ‘ भक्तांचे अनुभव छापण्यासाठीच हे मासिक असल्यामुळे जे अनुभव लिहून येतील तिकडे पूर्ण लक्ष दिले जाईल हे सांगणे नकोच. ’ श्री साईलीला मासिकाचे जे आजचे वाचक आहेत त्यांच्या हे सहज लक्षात येईल की पहिल्या संपादकांचे आश्वासन आजतागायत संपूर्णपणे पाळले जात आहे. साईभक्तीच्या प्रसारामुळे भक्त वाढत आहेत व त्यांचे अनुभवही विविध आहेत तेव्हा त्यांना प्रसिद्धी मिळणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे. तेव्हा भक्तांची ही अपेक्षा हे मासिक संपूर्णपणे पुरी करते हे ह्या मासिकाचे वैशिष्टय होय. श्रीसाईलीलाचे सुरुवातीपासूनचे संपादक पुढीलप्रमाणे—

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. लक्ष्मण गणेश उर्फ काकासाहेब महाजनी | | इ. स. | १९२३ |
| २) श्री. रामचंद्र उर्फ बाबासाहेब तर्खड | | ,, | १९२३ |
| ३) श्री. रामचंद्र रामकृष्ण सामंत | १९२३ | ते | १९३७ |
| ४) श्री. रामचंद्र वासुदेव घैसास | १९३७ | ते | १९४१ |
| ५) श्री. श्रीधर नारायण खारकर | १९४१ | ते | १९४३ |

१९४४ ते १९४७ हा काळ हे मासिक बंद होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ६) डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर | १९४७ | ते | १९५३ |
| ७) श्री. नागेशराव आत्माराम सावंत | १९५३ | ते | १९६० |

१९६० साली शिर्डी संस्थानसाठी प्रथमतः कोर्ट रिसीव्हर (न्यायालयधारक) नेमण्यात आला तेव्हापासून पुढील कोर्ट रिसीव्हरनी संस्थानचा कारभार पाहिला.

| | |
|---|---|
| श्री. गोपाळ विनायक क्षीरसागर | नोव्हेंबर १९६० |
| श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प | डिसेंबर १९६२ |
| श्री. भालचंद्र गणेश पोतनीस | डिसेंबर १९६४ |

श्री. दत्तात्रय दिनकर पाटणकर जुलै १९६७
श्री. काशिनाथ सीताराम पाठक डिसेंबर १९७०
श्री. क. हि. काकरे मे १९७८ पासून आजतागायत

श्रीसाईलीला मासिकाचे महत्व ओळखून वरील सर्व रिसीव्हरसाहेबांनी ते अव्याहतपणे चालू ठेवले व त्याच्या प्रकाशनासाठी लागणारे आर्थिक सहाय्य सतत संस्थानच्या पैशातूनच चालू ठेवले. आजही त्या मासिकाच्या प्रकाशनासाठी शिर्डी संस्थानला जवळजवळ दरवर्षी तीस पस्तीस हजार रुपयांची आर्थिक मदत करावी लागते. कोर्ट रिसीव्हर ह्यांना संस्थानच्या कार्यालयाचे काम भरपूर असते त्यामुळे त्यांना मासिकाच्या संपादनाकडे लक्ष पुरविणे शक्य होत नाही. म्हणून १९३२ पासून साठ पर्यंत प्रत्यक्ष संपादकाचे नाव मासिकावर छापून येत असे त्याऐवजी त्या सालापासून मुख्य संपादक म्हणून रिसीव्हरसाहेबांचे नाव छापले जात असले तरी प्रत्यक्षात हे काम कोणीतरी कार्यकारी संपादक नेमूनच करून घेण्यात येते. १९६० सालापासून ह्या मासिकाला कार्यक्षम असे कार्यकारी संपादक मिळत गेल्यामुळे ह्या मासिकाची वाटचाल उत्तरोत्तर प्रगतीपथावर पडत आली आहे. प्रस्तुत मासिकाच्या वाचकांना हे माहित आहेच की १९७४ पासून ह्या मासिकाच्या मराठी आवृत्तीचे कार्यकारी संपादक म्हणून श्री. सदानंद चेंदवणकर व इंग्रजी आवृत्तीचे संपादक म्हणून डॉ. श्री. दि. परचुरे हे काम पहात आहेत. हे दोन्ही संपादक साहित्य क्षेत्रातच नव्हे तर विविध क्षेत्रातही दिगंत सुकीर्ती मिळविलेले आहेत.

मासिकाच्या अंतरंगासंबंधी या ठिकाणी थोडेफार लिहिणे अप्रस्तुत होणार नाही. अगदी सुरवातीस हे मासिक संपूर्णतया मराठीत प्रसिद्ध होत असे. पुढे यथावकाश त्यात हिंदी व इंग्रजी लेखांचीही भर घालण्यात आली; परंतु जसजसे लेखक वाढू लागले तसतसे हे मासिक त्या सर्वांचे लेख सामावून घेण्यास असमर्थ ठरू लागले. म्हणून १९७३ साली ह्या मासिकाच्या दोन आवृत्त्या निघू लागल्या त्यापैकी एक संपूर्ण मराठी व दुसरी इंग्रजी व हिंदी लेखांची. ह्या वेळेपासून मासिकाची प्रगती झपाट्याने होऊ लागली व एप्रिल १९७३ ला जेवढे अंक निघत होते त्याच्या पाचपटीहून अधिक अंक आज निघत आहेत, आणि जो जो बाबांच्या भक्तीचा प्रचार वाढत आहे तो तो ही अंकांची वाढ सतत चालूच रहाणार आहे. यात शंकाच नाही.

१९७३ साली अंकात केवळ ४८ पानेच असत व वार्षिक वर्गणी केवळ सहा रुपयेच होती, पण १९८० सालच्या एप्रिलपासून मासिकाची पृष्ठसंख्या ४८ वरून ६४ वर नेण्यात आली व वार्षिक वर्गणीत अपरिहार्य अशी थोडी वाढ करून ती दहा रुपये करण्यात आली. अर्थात बाजारात मिळणाऱ्या अन्य मासिकाच्या मानाने

ही वर्गणी पुष्कळच कमी आहे; परंतु बाबांच्या भक्तीचा प्रचार हेच मासिकाचे ध्येय असल्यामुळे ही अल्प वर्गणी अशीच पुढे चालू राहील.

१९७५ सालापासून मासिकात लिहिणाऱ्या कवी व लेखकांचे एक संमेलन प्रतिवर्षी शिर्डीस भरत असते. त्यात होणाऱ्या विचारविनिमयामुळे मासिकात सुधारणा करणे व त्याचा दर्जा वाढविणे ही दोन कामे अधिक जोमाने हाती घेतली जातात. ह्या दोनही आवृत्त्यांच्या वाचकांकडून जी पत्रे संपादकांकडे येत असतात त्यावरून प्रस्तुत मासिकाचा दर्जा फार वरचा आहे, असे म्हणाल्यास त्यात अतिशयोक्ति आहे असे मुळीच नाही.

मासिक चालविणे हे एका माणसाचे काम नाही. लेखकांनी लेख पाठविले पाहिजेत. भक्तांनी मोठ्या प्रमाणावर वर्गणीदार झाले पाहिजे, संपादकांनी सर्व मजकूर वेळेवर छापखान्यात पाठविला पाहिजे म्हणजे मासिक वेळेवर निघते व वाचकांना ते वेळेवर पोचते. प्रस्तुत मासिकाची वाट कित्येक भक्त किती आतुरतेने पहात असतात हे त्यांच्या बोलण्यावरून वारंवार स्पष्ट होते. तेव्हा साईबाबांचा ज्या ह्या मासिकास संपूर्ण आशीर्वाद आहे ते हे मासिक श्री साईभक्तांच्या सेवेसाठी सतत प्रसिद्ध करण्याचे आश्वासन वरील सर्वांच्या सहकार्याने व साईबाबांच्या आशीर्वादाने आम्ही ह्या ठिकाणी देत आहोत व ही सेवा बाबांनी आमच्याकडून सतत करून घ्यावी अशी त्यांच्या चरणी मनःपूर्वक प्रार्थना करीत आहोत.

**भगवान श्रीसाईबाबांचे भक्तांना तसेच श्रीसाईलीलाच्या असंख्य वाचकांना शुभाशिष**

## महाराष्ट्र राज्याचे माजी साईभक्त राज्यपाल श्री. ओ. पी. मेहरासाहेब यांचा शुभसंदेश

RAJ BHAVAN
MALABAR HILL, BOMBAY 400 035
9 March, 1982.

Sir,

I am desired to acknowledge the receipt of a letter dated 19 February, 1982, addressed to the Governor, by Shri K. H. Kakare, and to convey his best wishes on the occasion of the completion of 30 years of the publication of the Monthly magazine Shree Saileela.

Yours faithfully,
(R. B. Budhiraja)
Secretary to the Governor.

भक्तांसाठी नवी माहितीपूर्ण लेखमाला...९

# शिरडीतील रामनवमी उत्सव

—श्री. सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्री साईलीला
श्री साईबाबा संस्थान शिर्डी

**जेथे रामनामाचे गर्जन । फिरे तेथे विष्णूचे सुदर्शन**
**कोटी विघ्नांचे निर्दाळण । दीन संरक्षण नाम हे**



वाल्मिकी रामायण हा महान ग्रंथ भारतीयानाच नव्हे तर जगातील सर्व राष्ट्रातील जनतेला सदासर्वकाळी आदर्शवत होऊन राहिलेला असा ग्रंथ आहे. रामकथाही आदरणीय व अनुकरणीय अशी जीवनगाथा आहे. या ग्रंथाचा रचनाकाळ हजारो वर्षापूर्वीचा आहे. परंतु त्यातील जीवनमूल्ये सर्व काळातील स्त्री–पुरुषांना पिता–पुत्र, पति–पत्नी, बहिण–भाऊ, भाऊ–भाऊ माता–पुत्र, सेव्य–सेवक, गुरु–शिष्य राजा–प्रजा या सर्वांनी एकमेकांशी कशा रीतीने वागावे याचा उच्चतम आदर्श या ग्रंथातील विविध पात्राच्या रूपाने जगापुढे ठेवण्यात आलेला आहे. प्रत्येकाने आपले जीवन सर्वोत्कृष्ट रीतीने कसे घालवावे व जगात सर्वांकडून भलेपणाचा बहुमान कसा मिळवावा हे रामायण काव्याच्या रूपाने वाल्मिकी महर्षींनी आपणास सांगितले आहे. त्यात प्रत्येकासाठी बहुमोल जीवनमंत्र सांगण्यात आलेला आहे. जगातील कोणत्याही वाङ्मयात अशा प्रकारची श्रेष्ठ कलाकृती निर्माण झालेली नाही. यात अजिबात अतिशयोक्ती नाही. रामकथा अतिशय रसाळ आहे. तिची गोडी अवीट आहे. या कथेचा एखादा बिंदू जरी प्राशन करता आला तरी तो आपल्या कल्याणासह कारणीभूत होणार आहे.

मर्यादारूपी पुरुषोत्तम प्रभू रामचंद्राचे महात्म्य भगवान संतचूडामणि श्रीसाईबाबांनी बरोबर ओळखले होते. जनता सुखी व्हावी, भारतात व जगात सर्वत्र आबादी

आबाद, सुख समाधान व प्रेमभाव वाढत रहावा हीच बाबांची मनिषा होती. त्यासाठीच तर त्यांचा अवतार! रामनामाचे तारक व पोषक महत्व बाबांनी अचूक ओळखले होते. जनमनावरील रामनामाची पकड बाबा बरोबर ओळखून होते आणि म्हणूनच तर त्यांनी आपल्या हयातीत शिर्डीस रामनामाचा, उत्सवाचा सुखद सोहळा सुरू केला आपल्या हयातीत त्यांनी तो सात आठदा बवितला, व आपल्या पश्चातही सर्वांच्या कल्याणास कारणीभूत होणारा सोहळा चालू रहावा अशी त्यांनी व्यवस्था लावून दिली. लोककल्याणासंबंधीची बाबांची ही भावना आपण समजावून घेतली पाहिजे.

शिर्डीमध्ये रामजन्मोत्सव शके १८३३ मवे बाबांनी सुरू केला, व तेव्हापासून तो यंदापर्यंत प्रत्येक वर्षी हा उत्सव व्यापक स्वरूपात व उत्साहात साजरा होत आहे ही बाबांचीच कृपा होय. हा उत्सव कसा सुरू झाला याची कथा मोठी रंजक आहे.

शिरडीमध्ये गोपाळराव गुंड या नावाचे बाबांचे एक परमभक्त होते. ते वारंवार बाबांच्या दर्शनास येत. बाबांवर त्यांची आत्यंतिक निष्ठा व भक्ती होती. निष्ठेचे फळ हे केव्हा ना केव्हा मिळावयाचेच. गोपाळरावास पुत्र संतती नव्हती. बाबांच्या कृपेने त्यांना तो पुढे लाभ झाला. आनंद झाला. प्रत्येक माणूस हा उत्सव प्रिय असतोच नाही का? उत्सव म्हणजेच चार मंडळींचा एकत्र मेळावा. सर्वांनी मिळून भक्तिभावाचा आनंद लुटायचा. या गोपाळरावांना शिर्डीत कोणत्यातरी निमित्ताने यात्रा जमावी असे वाटून त्यांनी उरूस सुरू केला. त्या निमित्याने गावोगावचे लोक फकीर इ. मंडळी शिर्डीत जमा होऊ लागली. त्यांच्या भोजनाची नीट व्यवस्था ठेवावयाची व त्यांची शक्य तितकी सेवा करायची, यात्रा भरवायची तर जिल्हाधिकाऱ्याची परवानगी प्रथम पाहिजे. अडचण उत्पन्न झाली. आरंभकाळी एका दुष्ट प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यामुळे तर परवानगीची अडचणच उत्पन्न झाली. बाबांच्या कानापर्यंत ही गोष्ट गेली. चार लोक प्रेम भावाने एकत्र जमले व त्यांनी एक–दोन दिवस घालवले तर त्यात काय बिघडले? बाबांची इच्छा तिच्यापुढे कुणाचे काय चालणार? शेवटी अधिकाऱ्याने परवानगी दिली.

योगायोगाने शके १८३३ मवे तो वार्षिक उरूस व श्रीरामनवमी एकदम आली. त्याच सुमारास उरूसानिमित्य भीष्म नावाचे बाबांचे एक परमभक्त शिर्डीत हजर होते. याच भीष्मांनी बाबांच्या अनेक आरत्या केलेल्या आहेत. उरूसाबरोबर पुण्यपावन असा श्रीराम जन्मोत्सवही आपण का साजरा करू नये? असे या भीष्म महाशयांना वाटू लागले. ती अर्थातच बाबांची प्रेरणा होती. कुणालातरी निमित्य मात्र करून जे जे कल्याणप्रद असेल ते ते करावयाचे ही बाबांची नेहमीची वृत्ति होती.

त्यानंतर बाबांचे परमभक्त ह. भ. प. दासगणू महाराज यांचे शिर्डीत आगमन झाले असता बाबांनी श्रीरामजन्मोत्सवाची जबाबदारी विनंतीपूर्वक त्यांच्यावर सोपविली व तो बाबांचा कृपाप्रसाद मानून त्यांनीही आनंदाने स्वीकारली. जोपर्यंत शिर्डीत रामजन्मोत्सवानिमित्त येणे शक्य होते तोपर्यंत स्वतः येऊन ती जबाबदारी त्यांनी यथायोग्यपणे व अत्यंत सुंदर रीतीने पार पाडली. त्यांच्या पश्चात् ती जबाबदारी मोठ्या भक्तिभावाने व आनंदाने श्रीदासगणू महाराजांचे पट्टशिष्य व ऋणानुबंधी ह. भ. प. अनंतराव आठवले हे आजतागायत उत्तम प्रकारे सांभाळीत आहेत इतकेच नव्हे तर त्यांची या उत्सवातील रसाळ व परिणामकारक कीर्तने हे एक महत्त्वाचे व प्रमुख आकर्षण होऊन राहिलेले आहे.

अशा प्रकारे शिर्डीतील रामजन्मोत्सवाचा सोहळा श्रीबाबांच्या वेळेपासून सातत्याने चालू आहे.

श्रीबाबांनी सुरू केलेला असा हा रामनवमी उत्सव शिर्डीला तीन दिवस धूमधडाक्याने साजरा होत असतो. चैत्र शुद्ध अष्टमीपासून उत्सवास सुरुवात होते. या दिवशी मंदिर नित्याप्रमाणे ५ वा. उघडते, ५–१५ वा. काकडआरती सुरू होते. त्यानंतर ६ वा. श्रींच्या तसबिरीची व पोथीची मिरवणूक वाजतगाजत समाधीमंदिरातून निघून ती गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत येते. त्याठिकाणी श्रींच्या फोटोची स्थापना चांदीच्या भव्य सिंहासनावर केली जाते. नंतर बाबांच्या पोथीच्या पहिल्या अध्यायाचे वाचन कोर्टरिसिव्हरसाहेब करतात व मग भक्तमंडळी रांग लावून एकेका अध्यायाचेच वाचन करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजेपर्यंत हा पोथीवाचनाचा कार्यक्रम द्वारकामाईत चालू असतो. अध्याय वाचणाऱ्यास श्रीफल दिले जाते. उत्सवाच्या पहिल्या दिवशी दुपारी चार वाजता संत श्री दासगणू महाराजांचे मानसपुत्र श्री. अनंतराव आठवले महाराज यांचे प्रवचन होते. रात्री ७–३० ते ९ व ९–३० ते ११ वाजेपर्यंत प्रसिद्ध कलाकार व्यक्तींच्या भजन–कीर्तन–गायनाचा कार्यक्रम संस्थानतर्फे आयोजित केला जातो. त्याचप्रमाणे रात्री ९–१५ ते ११–३० वाजेपर्यंत श्रींच्या पालखीची सवाद्य मिरवणूक गावातून काढली जाते. ही मिरवणूक गुरुस्थानाजवळ आल्यावर भारुड–गारुडाचा कार्यक्रम होतो व उत्सवाचा पहिला दिवस अशा प्रकारे संपतो.

उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे श्री रामनवमीच्या दिवशी श्रींच्या दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागलेल्या असतात. नेहमीचे श्रींचे कार्यक्रम होतातच पण त्या शिवाय श्रींच्या फोटोची व साईसच्चरित्र ग्रंथवाचनाच्या समाप्तीची मिरवणूक सकाळी ६ वा. द्वारकामाईतून निघून गुरुस्थानमार्गे वाजत गाजत समाधी मंदिरात जाते. बाबांचा फोटो समाधी स्थानी ठेवला जातो.

त्यावेळी काका महाजनी हे बाबांच्या पूजाअर्चादी नित्यक्रमाची व्यवस्था पहावयाचे, व बाबांच्या सहवासात असावयाचे भीष्म यांच्या मनात रामजन्म साजरा करण्याची कल्पना उद्‌भवली त्याबरोबर त्यांना फार आनंद झाला. बाबांच्या कानापर्यंत ही खबर जाणे व त्यांचा या बाबतीत कल लक्षात घेणे जरूरीचे होते. त्यांनी काका महाजनी यांना आपला मनोदय कथन केला. त्यांनाही तो फार आवडला. रामजन्म जर साजरा करावयाचा तर रामकथेचे निरूपण करणारा कीर्तनकार पाहिजे. त्याकाळी शिर्डीत कीर्तनकार मिळणे कठीण होते.

रामजन्मोत्सवाच्या प्रश्नावर काका म्हणाले, ‘तुमची कल्पना नामी आहे. परंतु कीर्तनकाराचे काय ?’

‘एवढेच ना ? मी होतो कीर्तनकार! तुम्ही तेवढा पेटीचा सूर धरा म्हणजे झाले! भीष्म म्हणाले.

सुंठवडा कोणी करावा व इतर कामे कुणी करावीत त्याचीही योजना या दोघांनी मिळून केली व ती संमत करून घेण्यासाठी ही मंडळी बाबांपाशी गेली.

काका पूजासाहित्य घेऊन भीष्म महाराजांसह मशिदीत बाबांपाशी गेले. पूजा अर्चा चालू असता बाबांनीच प्रश्न केला.

‘काय बेत चालला होता आपला सांगा ना आम्हाला!’

तो सवाल ऐकून त्या दोघांना अचंबा वाटला व त्याबरोबरच धीरही आला. बाबाच बुद्धी देणारे व जरूर ते कार्य करवून घेणारे मग तेथे अडचण कसली येणार ? काकांचे बोलणे ऐकून घेऊन बाबांनी रामजन्मोत्सव साजरा करण्यास आपली लगेच संमति दिली. इतकेच नव्हे तर तो शिर्डीतील अगदी पहिलाच असा श्रीरामजन्मोत्सव बाबांनी यथासांग करवून घेतला.

पुढे तिची प्रथा सुरू झाली ती श्रीसाईबाबांच्या कृपेने अगदी आजतागायत प्रतिवर्षी नेमाने व वाढत्या अतीव उत्साहाने सुरू आहे. शिर्डीतील राम जन्मोत्सवाच्या पहिल्या वर्षी भीष्म हे कीर्तनकार होते. पुढे दुसऱ्या वर्षी श्री बाळाबुवा सातारकर यांचे शिर्डीत बाबांच्या भेटीनिमित्त आगमन झाले असता त्यांच्या कीर्तनाचा सुयोग केवळ यदृच्छेनेच घडून आला.

नंतर कावडी मिरवणूकीचा खूपच मोठा कार्यक्रम असतो. शिरडी गावातील भाविक मंडळी व बाहेर गावाहून आलेले साईभक्त कोपरगाव मुक्कामी रात्री जाऊन गोदावरी नदीचे पाणी घेऊन नऊ मैल पायी चालत येतात. सकाळी ६–३० वा. श्री. रिसिव्हर साहेब या कावडींची पुजा करतात सुमारे पाचशेवर कावडींची मिरवणूक वाजत गाजत गावागावातून येते. मंदिरा जवळ ही मिरवणूक आल्यावर सुवासिनी त्या कावडींना ओवाळतात. नंतर कावडीतील हे जल बाबांच्या समाधीस वाहिले जाते. कावडीवाल्यांना श्रीफळाचा प्रसाद दिला जातो. हा कार्यक्रम तब्बल दोन तास चालतो. सकाळी १०–३० ते दुपारी १२–३० वाजेपर्यंत श्री. आठवले महाराजांचे रामजन्म आख्यान कीर्तन होते. सायंकाळी ४–३० वा. श्रींच्या निशाणांची व पाच वाजता रथाची मिरवणूक निघते, यादिवशी सबंध रात्रभर मंदिर भक्तांच्या दर्शनास खुले असते, व रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित कलाकार मंडळी श्रींच्या समोर गायनाची हजेरी लावतात.

उत्सवाचे तिसऱ्या दिवशी श्री देव रात्रभर जागे असल्यामुळे पहाटेला काकड आरती होत नाही परंतु नित्य षोडषोपचाराचे कार्यक्रम होतातच. सकाळी १०–३० ते १२–३० पर्यंत दहीहंडीचा कार्यक्रम समाधी मंदिरासमोरच्या प्रांगणात धूमधडाक्याने होतो. फुगड्या, झिम्मा हे कार्यक्रम पण यावेळी होतात. या वेळात श्री. अनंत आठवले महाराजांचे गोपाळकाला कीर्तन होते व आरतीनंतर तीर्थप्रसाद झाल्यावर श्री रामनवमी उत्सवाचा हा कार्यक्रम संपतो.

शिरडीत हा अशा प्रकारे उत्सव श्री बाबांच्या वेळेपासून साजरा होत आलेला आहे.

●

श्री साईलीला मे ८२ अंकाचे प्रमुख आकर्षण इंदूरचे प्रख्यात संत **श्री भैयाजी महाराज** ले. श्री गणपतराव सामंत

# श्री साईनाथांच्या श्री साईलीलावर भक्तांनी अक्षरशः केलेला शुभकामनांचा वर्षाव

## माननीय श्री. शंकरराव चव्हाण यांचा संदेश

● श्री साईबाबा संस्थान, शिरडीतर्फे प्रकाशित होणारे 'श्री साईलीला' हे मासिक यंदा एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण करीत असल्याचे ऐकून आनंद वाटतो. परब्रह्म दत्तावतारी श्री साईबाबांचा कृपासंदेश वाङ्मय व लिखाणातून सर्व दूर पोहचविण्याची जबाबदारी हे मासिक वाहत आहे, ही एक श्रेष्ठ सेवाच होय. साधकाचे अनुभव व साधनेचा मार्ग घरोघरी पोहचवून समाजात वावरणाऱ्या नितिभ्रष्ट व पथभ्रष्ट लोकांपासून स्वतःला वाचवून स्वतःची आत्मिक उन्नती कशी करून घ्यावी ही शिकवण सखोल रुजू करण्याचे कार्य ह्या मासिकाद्वारे करण्यात यावे अशी अपेक्षा ठेवणे योग्यच ठरेल.

'श्री साईलिला' मासिकाला मी सुयश चिंतीतो व चालक मंडळीचे अभिनंदन करितो.

श्री साईबाबा चरणी माझा नतमस्तक प्रणाम.

**—शंकरराव चव्हाण**
योजना मंत्री व उपाध्यक्ष योजना आयोग, नवी दिल्ली

श्रीसाई म्हणजेच आई, साईमाऊलीच्या सहवासात असताना कली काळाचीही भीती वाटत नाही. श्रीसाईलीला मासिकातून साईअमृत लीलेचा प्रसाद भक्तांना मिळतो. अशा मासिकाच्या एकसष्ठीला आमच्या कोटीकोटी शुभेच्छा.

**—श्री अवधूतानंद महाराज**

'साईलीला' हे श्री साईबाबांच्या चरणी वाहिलेले मासिक ६१ व्या वर्षात पदार्पण करीत आहे ह्यातच ह्या मासिकाची लोकप्रियता दिसून येते.

उत्कृष्ट सजावट, निवडक साहित्य यांची ६० वर्षाची परंपरा अशीच उत्तरोत्तर पुढे चालू राहो हीच बाबांच्या चरणी प्रार्थना !

**—शरद गाळवणकर**
श्रीदत्त फिल्म्स

१९ एप्रिल-पुण्यतिथी निमित्त खास लेख

# भगवान परमहंस परिव्राजकाचार्य श्रीधर स्वामी महाराज सज्जनगड



● काही वेळा शाप हा वर ठरतो तसाच पत्की घराण्याला मिळालेला भयंकर शाप नारायणरावांना व कमळाबाईंना वरही ठरला. तुमचा निर्वंश होईल असा शाप त्यांना देण्यात आला, पण तुमच्या कुळात एक थोर संन्यासी जन्माला येऊन तो कुळाचा व जगाचा उद्धार करील असा उःशापही त्याने दिला. हा त्यांना खरोखरच शाप नसून वरच मिळाला होता.

त्या करिता त्यांना गाणगापूरला जाऊन तपश्चर्या करावयास पाहिजे होती. ते उभयता गाणगापूरला जाऊन कडक सेवा करू लागले. गुरुचरित्राची पारायणे सुरू असतानाच साक्षात् श्री दत्तात्रयाने येऊन श्रीफळाचा प्रसाद हाती देऊन वर दिला हे श्रीफळ भक्षण करा तुमची इच्छा पूर्ण होईल. दिव्य आनंदाने त्या उभयतांची अंतःकरणे भरून गेली. त्या आनंदातच पारायणे पूर्ण करून व प्रसाद भक्षण करून ती उभयता हैद्राबादला परत आली होती. सौ. कमलाबाईंना दिवस गेले. मार्गशिर्ष पौर्णिमेला बरोबर संध्याकाळी दत्तात्रयाचे जन्मवेळी सौ. कमलाबाईंना पुत्ररत्न झाले. बाळाचे नाव श्रीधर ठेवण्यात आले.

सौ. कमळाबाईंच्या मातृवात्सल्याने श्रीधर हळूहळू वाढू लागले. त्याला आई प्रेमाने म्हणत असे राजाचे हसणे इतके सुंदर असावयाचे आकर्षक असावयाचे की कोणालाही त्याच्याकडे बघून प्रसन्नता वाटावयाची, समाधान वाटावयाचे. श्रीधर राजा तीन वर्षांचा झाला तोच त्याचे पितृछत्र हरपले. सौ. कमलाबाईवर आकाशाची

कुऱ्हाड कोसळली. बाळ श्रीधराच्या चुणचुणीत मूर्तीमुळे व तरतरीत चेहऱ्यामुळे सर्व-जण त्याचेवर खूष असावयाचे. राजा श्रीधर खोडकर विद्यार्थी होता. हुबेहुब नकला करावयाचा. कुस्ती, व्यायामाची व खेळाची त्याला आवड होती.

राजा श्रीधरला तीन भावंडे होती. मोठा त्रिंबक हा वयाच्या बाविसाव्या वर्षी ऐन तारुण्यात देवाच्या घरी गेला. त्याच्या खालचा भाऊ गोविंदा त्याला बालवयातच मृत्यूने गाठले. बहिण गोदावरी. राजा श्रीधराचे गोदावरी ताईवर प्रेम होते परंतु वयाच्या पंचविसाव्या वर्षी ती निधन पावली. राजा श्रीधर १२ ते १६ वर्षांचे झाले नाही तोच निर्घृण काळाने त्यांच्या आईला त्यांच्यापासून ओढून नेले.

राजा श्रीधराच्या वडिलांचे नाव नारायणराव. त्यांचे आडनाव पत्की. ते देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. श्री. नारायणराव पत्की हे हैद्राबादचे सुखवस्तु गृहस्थ. त्यांचे गाव देगलूर म्हणून त्याना नारायणराव देगलूरकर म्हणून लोक ओळखत.

निर्घृण काळाने आईला नेल्यावर काही दिवस मावशीकडे गुलबर्ग्याला ते राहिले तेथे त्यांचे मन रमेना म्हणून ते पुण्याला आले व अनाथ विद्यार्थीगृहात राहू लागले. तेथील ते आदर्श विद्यार्थी होते. ते शिस्तीचे फार भोक्ते होते.

धर्माची चाललेली अवनती पाहून राजा श्रीधराचे मन कळवळे. त्यांना त्याबद्दल अतीव दुःख होई म्हणून विजयादशमीला त्यांनी सज्जनगडावर तपश्चर्येला जाण्याचे निश्चित केले, व आपल्या मित्र मंडळीना निश्चय सांगितला. त्यावेळी मित्र म्हणाले, श्रीधर, तुम्ही पुढे मागे परमहंस होणार! परमहंस झाल्यावर आमची आठवण होईल का? श्रीधर हसून म्हणाले, माझी हजारो छायाचित्रे काढून माझ्या समोर ठेवली तर जसे मला वेगळे म्हणून काही न दिसता ही माझीच सर्व छायाचित्रे असे वाटून त्यात वेगळी भावना राहणार नाही. त्याप्रमाणे तुम्ही माझीच रूपे आहात असे मला वाटेल. माझ्याव्यतिरिक्त मला कसलेही भान राहणार नाही. लहान मोठा प्रश्नच उरणार नाही जेथे श्रेष्ठ कनिष्ठ भावना शिल्लक राहते ती पूर्णावस्था नव्हे. तपानेच ती अवस्था प्राप्त व्हावी म्हणून माझा हा प्रयत्न आहे. केवढी ही धारणा त्या बालवयातच होती. कित्येक जन्म घेतले तरीं अशा धारणेचा अंकुर फुटणे कठीणच.

दुसऱ्या एका प्रसंगी मित्रांशी बोलताना श्रीधर म्हणाले, "मला पाहिल्याबरोबर सर्व धर्मियाना आपली ध्येयमूर्ति हीच असे वाटो. मी सर्वांचा आत्मा आहे. माझ्या दर्शनाने सर्वांना भावना याव्यात खरे पूर्णत्व मनुष्यास कसे लाभेल हाच एक प्रश्न त्यांच्या सर्व विचारांचा मुख्य विषय होऊन राहिला होता.

तपश्चर्येकरिता सज्जनगडावर जाण्याचे निश्चित ठरवले. ते पुण्याहून पायीच चालू लागले. पाऊस खूप पडत होता त्याचीही त्यांनी पर्वा केली नाही. जर का आपण बिनचूक बनेश्वरकडे गेलो तर मी आंखलेला ध्येयमार्ग बरोबर ध्येयाकडे नेईल व मार्ग चुकला तर माझा ध्येयमार्गही चुकला असे समजू म्हणून ते ज्या रस्त्याने गेले तो रस्ता बरोबर बनेश्वरचाच होता. तेथे थोडा वेळ मुक्काम करून पुढे ते सज्जनगडावर गेले.

रोज सकाळी लवकर उठावे, स्नान करावे, सर्व ठिकाणचे झाडून घ्यावे, जप जाप्य करावे, येणाऱ्या यात्रेकरूंची सेवा करावी, त्यातल्या त्यात म्हातारे आणि आजारी यांची सेवा करावी, सर्वांची सेवा करताना लोक मुक्त कंठाने त्यांना आशिर्वाद देत, सर्वांची मनोभावे सेवा करणे त्यांच्या आवडीचा विषय होता. हातानी काम व मुखाने नाम म्हणत स्वारी नेहमी आनंदात असावयाची रोज माधुकरी मागून आणावयाची, अन्नपूर्णेची पूजा करावयाची व प्रार्थना करीत. हे अन्नपूर्णे मला ब्रह्मरूप अन्नापासून उत्तम विचार सुचोत. माझी धारणा वाढावी जगाचा उद्धार करण्याचे काम यशस्वी रितीने करण्याइतकी पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून प्रार्थना करीत. माशाना व गाईला काही भाग देऊन नामस्मरण घेत घेत अन्न भक्षण करीत.

एक दिवस श्रीधर रामदास स्वामींच्या समाधीजवळ ध्यानमग्न बसले असता साक्षात् समर्थांनी मस्तकावर हात ठेवला. महावाक्याचा उपदेश करून त्यांच्या अर्थाचे-थोडावेळ विवरण केले. उभयतांचा मूक संवाद बराच वेळ चालला होता. महाराज बराच वेळ निमग्न होते. श्री समर्थांची तेजोमय मूर्ती केव्हा अंतर्धान पावली ते त्यांच्या लक्षात आले नाही. सन १९३० च्या श्री दासनवमीला समर्थांच्या आदेशा-प्रमाणे श्रीधर सज्जनगडवरून दक्षिणेकडे संचारार्थ निघून गेले. श्रीधर म्हणजे गडा-वरची शांत तेजोराशी म्हणून लोक त्यांचे वर्णन करीत. पुढे ते भगवान श्रीमत परमहंस परिव्राजकाचार्य श्रीधर स्वामी महाराज या नावाने सर्वत्र ओळखले जाऊ लागले.

श्रीधर स्वामींचा १९४२ साली संन्यासविधी शिगेहळ्ळी मठात मोठ्या थाटाने साजरा झाला. पुढे त्यांनी भंगळूर, भीमस्वामींचा मठ, तंजावर, हिमालयातील बद्री-नाथ, गिरनार, जुनागड, श्री द्वारकाक्षेत्र, नरसोबाची वाडी, स्वतःची मायभूमी देग-लूर, इंदूर, सागर, कुरवपूर क्षेत्र, दत्तस्थान, हिमालयातील उत्तर काशी अयोध्या, रामेश्वर, श्री काशीक्षेत्र व महाराष्ट्रात स्वामींचा दौरा झाला होता.

श्रीधर स्वामी सज्जनगडावर "आर्य संस्कृती" ग्रंथ लिहित होते. वेळ दुपार-चीच होती, गडावर गंगाक्का म्हणून बाजूच्या खोलीत रहात होत्या. गंगाक्कांचा

अवतार संपला म्हणून श्री कासेगावकरांनी गंगाक्कांच्या पायाची नाडी बघून सांगितले त्यांचे हात पाय बर्फाप्रमाणे थंडगार झाले होते. स्वामी श्रीधर कुटीतच एकांतात लिहित होते. रडण्याचा आवाज ऐकून स्वामींनी विचारले, काय झाले ? कोण रडतो ? तेव्हा गंगाक्काना देवाज्ञा झाल्याचे कळले. स्वामी मोठ्या गर्दीतून गंगाक्काच्या खोलीत आले. स्वामी गंगाक्काच्या अंथरुणाजवळ आले. गंगाक्कांना नीट पाहिले व पाणी आणण्यास सांगितले. पाणी मंत्रून जमिनीवर घालण्यास लागले. त्यावेळी ते अव्यक्त व्यक्तीला एवढेच सांगत होते. फक्त दोनच वर्षे. ते काही चालावयाचे नाही. मी तिची दोन वर्षे वाढविणारच. मला तिच्याकडून थोडे महत्त्वाचे काम करून घ्यावयाचे आहे. म्हणून बोलत होते. स्वामी ॐ चा ध्वनी डोळे मिटून उत्साहाने व मोठ्याने करीत होते. शेवटी स्वामींनी उभे राहून गंगाक्कांचा हात धरून स्वतःचा पाय जमिनीवर जोराने आपटला, आणि काय चमत्कार ! गंगाक्का झोपेतून जागे व्हावे तशा जाग्या झाल्या हलू लागल्या, श्वासोच्छवास सुरू झाला. सर्वांना आश्चर्याचा धक्काच बसला. गंगाक्कांनी डोळे उघडले, दोन तास विष्णूला स्वतःच्या सामर्थ्याने प्रार्थनाकरून स्वामींनी गंगाक्काचे प्राण परत आणले होते. प्रत्येकजण गंगाक्काना व स्वामींना बघून जात होते व त्यांच्या अमाप दैवी शक्तीबद्दल आदर दाखवित होते. काष्ठात देव निर्माण करणारे समर्थानंतर स्वामीच होय. धन्य ते गुरुशिष्य !

स्वामींच्या तीर्थाने लोकांची कामे होत. एकदा स्वामी हैद्राबादला गेले होते. रोज पुष्कळ लोक त्यांच्या दर्शनास येत. त्यावेळी श्री. रामराव गायकवाड नावाचे एक गृहस्थ आले होते. स्वामींना ती उभयता गयावया करून सांगत होती की आमुच्या हलगर्जीपणामुळे कोंड्यातून म्हशीच्या पोटात सुई गेली आहे. सर्व तऱ्हेचे उपाय झाले, डॉक्टरांनी ऑपरेशन केले पण काही उपाय झाला नाही. ती ५–७ दिवसांपूर्वीच व्याली आहे. तिने वैरणीच्या काडीलाही स्पर्श केला नाही. आम्ही फार काळजीत आहोत. स्वामी काहीही करा. आमच्या म्हशीला बरे करा. ती आमच्या संसाराची वैभव आहे. म्हणून गयावया करून रडू लागली. स्वामी अत्यंत दयाळू मायाळू होते. त्यांना जोडप्याची दया आली. त्यांनी म्हशीला पाजण्यास तीर्थ मंत्रून दिले. ते जोडपे तीर्थ घेऊन घरी गेले. म्हशीला भक्तीने, श्रद्धेने पाजले आणि काय चमत्कार थोड्याच वेळात म्हशीच्या शेणातून सुई वर आली दोन दिवस आम्ही केलेल्या प्रयत्नांना जे फळ आले नाही हे फक्त श्री स्वामींच्या मंतरलेल्या तीर्थाचे सामर्थ्य !

स्वामींच्या तीर्थाने वेडे शहाणे झाले, भूत-पिशाच्च बाधा नाहीशी झाली. त्यामुळे त्यांना साक्षात् परमेश्वराचा अवतार समजत. ब्रह्म साक्षात्कार म्हणजे स्वरुप कैवल्यस्थितीचा अत्यंत विलक्षण असा स्वानुभव यातून प्रगटलेला विचार श्रीस्वामींनी त्यांच्या अनेक ग्रंथाद्वारे संस्कृत, मराठी, कानडी इत्यादी भाषेतून लिहिला आहे.

आचार्य प्र. के. अत्रे म्हणतात श्री स्वामीजींचे संन्यास ग्रहाचे चरित्र म्हणजे श्री समर्थांचेच उत्तर चरित्र म्हणता येईल. त्यांचेकडे अनेक विद्वान, सज्जन लहान-मोठे, चांगले-वाईट संत संन्यासी असे सारे प्रजाजन श्रीच्या दर्शनाला झुंडीच्या झुंडीने येत असत.

पुष्कळ लोक त्यांना साक्षात् दत्ताचा अवतार म्हणून ओळखत. त्यांचे महाराष्ट्रात व कर्नाटकातही अनेक वर्षे वास्तव्य होते. त्यांची हजारो भक्त-शिष्य-चाहाते मंडळी भारतभर आहेत. समर्थांच्या ३५० व्या जन्ममहोत्सानिमित्त त्यांचा महाराष्ट्रभर संचार झाला होता. १९५९ साली चातुर्मासही सज्जनगडावर केला होता. त्यांनी केलेले चमत्कारही सर्वांच्या परिचित आहेत. त्यामुळे ते महाराष्ट्रालाही ज्ञात आहेतच. त्यांचे सज्जनगडावर 'श्रीधर कुटी' हे निवासस्थान आहे. त्यांची वाणी निर्मळ व मांगल्याने ओतप्रोत भरलेली असून निःसंदिग्धपणे वेदांत सिद्धांत प्रस्थापित करणारी होती. त्यांच्या चरित्रातील लहान मोठे प्रसंग अतिशय बोलके आहेत.

श्रीधरस्वामी आधीच साक्षात्कार समयी संन्यासी म्हणजे सम्यकन्यासी सर्वसंग परित्यागी होते. अतएव कोणा एका व्यक्तीकडून दिक्षा न घेता त्यांनी स्वयंविद्वत संन्यात घेतला यालाच सर्व श्रेष्ट दिक्षा म्हणतात.

श्रीधर स्वामीचे कर्नाटकात वरदपूर येथे वास्तव्य होते. १९ एप्रिल १९७३ साली सकाळी म्हणजे गुरुवारी पहाटे ते आसनस्थ झाले होते व सकाळी आठच्या सुमारास श्रीनी दुधही घेतले. तशी स्वामींची प्रकृती बरी नव्हती. सेवेकरी परिस्थिती जाणून होते. त्यांनी स्वामींना कोणाला काही सांगावयाचे आहे का ! म्हणून विचारले त्यावेळी ते म्हणाले, मला जे काही सांगावयाचे ते मी श्रीदासनवमीलाच सांगितले आहे. मला आता कोणालाही भेटावयाचे नाही व कोणालाही काही सांगावयाचे नाही. असे सांगून दोघा सेवेकऱ्याना आशीर्वाद देऊन ८-५० वाजता दिर्घपूरक करून कुंभक केला. तो कायमचाच. पुढे वाऱ्यासारखी ही बातमी महाराष्ट्रात व भारतभर पसरली. हजारो भक्त, शिष्य गण मिळेल त्या वाहनाने तिथे येत होते. लाखो भक्तांनी साश्रु नयनांनी शांततेने दर्शन घेतले. ज्या ठिकाणी श्रीस्वामीजींचे महानिर्वाण झाले तेथेच समाधी बांधण्यात आली. समाधीच्या पृष्ठभागावर श्रीराम व ओंकारानी कोरलेले आहे.

संत दिपस्तंभासारखे असतात. साधकाने आपली नावे त्यांच्या प्रकाशात दक्षतेने वल्हवून कपाळमोक्षरूप अप्रातीचा धोका टाळला पाहिजे. साधकाना एवढे जमले की त्यांनी श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य सद्गुरु भगवान श्रीधर स्वामी महाराजांना खरी श्रद्धांजली वाहिली असे होईल.

# षड्रिपु का षड्मित्र ?

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर
१/१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंटस
बंड गार्डन रोड, पुणे–४११००१



● आपल्या धर्मशास्त्रावरील ग्रंथात काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे मनाचे सहा ( षड् ) शत्रु ( रिपु ) समजले जातात. कारण हे परमार्थमार्गातील मोठे अडथळे आहेत. भगवद्गीतेत तर काम, क्रोध आणि लोभ या तिघाना नरकाची द्वारेच म्हटली आहेत.

परंतु नीट विचार करून पाहिला तर संसारी माणसाना या विकारा शिवाय चालतच नाही. किंबहुना संसारात आपली प्रगती करण्यासाठी यांची मदत लागतेच. परमेश्वराचे जननिर्मितीचे कार्य इतके योजनापूर्वक आहे की त्यातील कुठलीही वस्तु विनाकारण उगीच उत्पन्न केलेली नाही. शरीर शास्त्रातच पहा ना ! इतके वर्ष डॉक्टरांना वाटायचे Tonsils ( घशातील दोन गाठी ) व Appendix ( आतड्याला चिकटलेली पुरवणी नलिका ) काही उपयोगाची नाहीत. परंतु आता त्यांना त्यांचे अज्ञान उमगले व पटले की त्यांची देखील काही कार्ये आहेत. तसेच वरील सहा विकारांचे. ही अगदीच टाकाऊ नाहीत.

काम म्हणजे कुठल्याही गोष्टीची इच्छा असणे किंवा कामवासना, कुठल्याच गोष्टीची इच्छाच न केली तर ते कार्य कसे होणार ? परिक्षेत पास होण्याची इच्छाच नसली तर विद्यार्थी परिक्षेत पास कसा होणार ? तसेच कामवासनाच या जगातून काढून टाकली तर प्रजोत्पादन कसे होणार व सृष्टि अव्याहत कशी चालणार ? शिवाय या दुःखी संसारात प्राण्यांना कधी मधी मिळणारे संभोगाचे उत्कट सुखाचे क्षणही नाहीसे होणार.

क्रोध ( राग ) आला म्हणजे माणसाला एक प्रकारची काही तरी कृती करण्याची शक्ती येते. प्रभू रामचंद्रांना अत्यंत क्रोध झाला तेव्हाच ते दुष्ट रावणाचा वध करू शकले. द्रौपदीचे भर सभेत वस्त्रहरण झालेले पाहून भीमाला अत्यंत क्रोध आला म्हणूनच त्याने दुःशासन व दुर्योधन यांना मारण्याची प्रतिज्ञा केली व ती तडीस नेली. आमच्या शूर सैनिकांना क्रोध आला नाही तर ते शत्रूंवर कसे तुटून पडतील ?

लोभ ( हाव ) कोणत्याही गोष्टीचा नसला तर आपल्याला आहे या स्थितीतून आणखी पुढे वर कसे जाता येईल ? उदा. कारकूनाने ऑफिसर व्हावयाची हाव धरणे, व्यापाऱ्याने धंद्यात आणखी भरभराटीची आशा करणे, विद्यार्थ्याने आणखी ज्ञान मिळविण्याचा लोभ धरणे, फार काय परमार्थांत देखील भक्ताने आपल्या इष्ट देवतेची आणखी भक्ती करण्याची हाव धरणे वगैरे. खरे म्हणजे लोभ किंवा हाव ही माणसाच्या प्रेरणेचे मूळच आहे.

मोह म्हणजे आसक्ति किंवा प्रेम. हे नसले तर संसारी माणसाचे जीवनच व्यर्थ. तो जगतोच मुळी पत्नी व मुलेबाळे यांच्या प्रेमासाठी. त्याचे सर्व व्यवहार, प्रयत्न, कष्ट त्यांना सुखी ठेवण्यासाठीच असतात.

मद म्हणजे अभिमान. अहंकार, माणसाला स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल, विद्येबद्दल, निरोगी व बळकट शरीराबद्दल अभिमान नको का ? त्यामुळेच तर त्याला आत्मविश्वास वाटतो आणि या जगात आपली कार्ये सिद्धीस नेण्याची धमक वाटते. आपल्या देशाचा मातृभूमीचा अभिमान धरणे काय वाईट गोष्ट आहे ? सैनिकाला देशाभिमानाचे बाळकडू पाजले नाही, त्याच्या पूर्वजांच्या कर्तृत्वाचा, शौर्याचा अभिमान त्याच्या मनात ठसविला नाही तर तो शत्रुशी प्राणांत झुंज कशी देऊ शकेल ?

मत्सर म्हणजे दुसऱ्याची संसारातील प्रगति सहन न होणे उदा. शेजाऱ्याने किंवा मित्राने स्कूटर किंवा टी. व्ही. विकत घेणे, ऑफिसातील सहकाऱ्याला प्रमोशन मिळणे, वर्गातील संवगड्याचा पहिला नंबर येणे वगैरे. नुसता मत्सर करणे किंवा मत्सर करून दुसऱ्याचे वाईट इच्छिणे हे तर वाईटच. परंतु मत्सरामुळेच चढाओढीचे बीज पेरले जाते ना ? त्यामुळेच आपल्यालाही आणखी प्रयत्न करण्याची उमेद येते

व त्या सहकाऱ्याला मागे टाकून आपली त्याच्यापुढे प्रगती करून घेण्याची तीव्र इच्छा उत्पन्न होते. मत्सर नसलाच तर जागतिक खेळात (World Olympics) मध्ये भारताला सुवर्णपदके कशी मिळणार?

यावरून वाचकांच्या लक्षात येईल की हे सहाही षड्रिपु म्हटले जाणारे विकार खरोखरीच आपले शत्रु नाहीत. त्यांची या संसारात आपल्याला निहायत जरूरी आहे. मग आपल्या शास्त्रात व पुराणात यांना शत्रु का म्हटले आहे? त्यांच्यापासून दूर राहण्यास का बजावले आहे?

त्याचे कारण असे आहे. पहिली गोष्ट म्हणजे हे अत्यंत बलवान विकार आहेत. त्यांच्या तावडीत एकदा कमकुवत मनाचा गृहस्थ सापडला की त्याची बुध्दीच ते हिरावून घेतात आणि मग तो चटकन अधोगतीला जातो. कामवासना प्रबळ झाली की मनुष्याचे भानच हरपते. 'कामातुराना न भयं न लज्जा' हे सुभाषित प्रसिद्धच आहे. कामवासनेपायी बलात्कार करून तुरुंगात गेलेली किंवा व्यभिचार करून आपली अपकीर्ती करून घेणारी उदाहरणे काय जगात थोडी थोडकी आहेत का? तसेच क्रोधाचे. राग आवरता नाही आला तर माणूस खूनही करून बसतो आणि मग पश्चातापाची पाळी येते. रागाच्या भरात आपल्या प्रिय व्यक्तीलाही आपण काहीतरी बोलून जातो आणि ते परत घेता येत नाही. लोभापायी रेसकोर्सवर एका क्षणात भिकारी झालेले सट्टेबाज लोक आपण पाहतोच की, मोहापायी (प्रेमापायी) आत्महत्या करून किंवा अत्यंत निराश होऊन आपल्या चांगल्या आयुष्याचा नाश करून घे णाऱ्या तरुणतरुणींच्या बातम्या तर आपण वर्तमान पत्रात नेहमीच वाचतो.

मदाने उन्मत्त झालेला माणूस आपल्याला आवडतो का? त्याचेबद्दल तिरस्कार व घृणाच असते. अहंकार मग तो पैशाचा असो, अधिकाराचा असो किंवा सौंदर्याचा असो. या सर्व गोष्टी काय कायम टिकणाऱ्या आहेत? त्या गेल्या की त्या माणसांची काय दीन परिस्थिती होते? कोणीही विचारीनासे झाले म्हणजे ती किती दुःखी कष्टी होतात?

राहता राहिला मत्सर. शेजाऱ्याचे वैभव पाहून कितीतरी गृहिणी जळतात आणि आपल्या संसारात अशांती आणतात? मग त्या शेजाऱ्यांचे वाईट इच्छिण्याची बुद्धी होते व त्यासाठी मग अयोग्य कर्मेही केली जातात. उगाच ताप आणि त्रास.

एकूण हे विकार जर ताब्यात ठेवले नाहीत तर ते आपल्याला वाईट मार्गाला नेतात, आणि आपली अधोगती करतात. दारुच्या एकच प्याल्याप्रमाणे हे आहे. एकच प्यालाने कदाचित जेवण पचायला मदत होईल. थोडीशी स्फूर्ति येऊन इतर दुःखाचा विसर पडून मन प्रफुल्लितही होईल. परंतु येथेच थांबले नाही व तिच्या

आहारी गेले की सत्यानाशच. म्हणूनच दारूच्या पहिल्या घोटापासून दूरच रहावयास शहाणे लोक आपणास सांगतात. तसेच या ६ विकारांचे आहे. संसारात हे भेटतातच. पण त्यांचेवर पूर्ण ताबा ठेवला पाहिजे. तरच त्यांचेपासून आपल्याला फायदा होतो.

आणि परमार्थात तर हे खरोखरीच शत्रु आहेत. या मार्गात मनाची शांती लागते, मन एकाग्र व्हावे लागते, मन शुद्ध असावे लागते व पापकर्म अजिबात टाळावे लागते. परंतु याच गोष्टी हट्टाने या सहा विकारांमुळे घडतात. म्हणूनच मुमुक्षु जनांना हे अगदी त्याज्य आहेत, आणि ज्ञानी लोकांनी या विकाराना अशा जनांसाठी धोक्याचे कंदील किंवा नरकाची द्वारे म्हटले आहे ते काही खोटे नाही.

असो, श्री साईबाबा हे सर्व जाणून होते म्हणूनच त्यांनी आपल्या सामान्य भक्तांना संसार करू दिला व त्यांना फक्त या विकाराना हळूहळू ताब्यात आणावयाची शिकवण दिली. उदा. तात्या पाटील यांचे लग्न झाल्यावर त्यांना मशिदीत आपल्या जवळ झोपू न देता घरी झोपण्यास सांगितले. नानासाहेब चांदोरकरांचे एका सुंदर स्त्रीचा चेहरा पाहून मन विचलित झाले असताना 'बनता बनता बनले' असे सांगून इंद्रियाना हळूहळू ताब्यात आणण्याचा सुंदर उपदेश केला. विष्णुसहस्रनामाच्या पोथीवरून शामावर चिडलेल्या रामदास्याला क्रोध आवरण्यास शिकविले. दामूअण्णा-कापूस व धान्य यांचा सट्टा खेळण्यास निघाले असताना आपली अर्धी भाकर देव देतो ती समाधानाने खाण्यास सांगून त्यांना लोभापासून वाचविले. मानस सरोवरास जावयास निघालेल्या मद्रासी संन्यासाचा अंतसमय जवळ आलेला पाहून त्याचे कल्याण साधण्यासाठी त्याला स्वतःच्या आईला भेटण्यासाठी परत जाण्याची परवानगी नाकारून 'साजेना महत्व या वेषाला। कलंक भगव्याला लाविला॥' असे म्हणून या संन्यास्याला मोहापासून दूर राहण्याचा योग्य उपदेश दिला. नांदेडच्या पुंडलीक-राव वकीलांचे नारळाचे आख्यान घडवून त्यांना व त्यांचेबरोबर सर्व भक्तानाच अहं-कार सोडण्याबद्दल उत्तम तऱ्हेने उपदेश समजावून सांगितला.

अशा प्रकारे या षड्रिपुंना ताब्यात ठेवण्याचे उपाय तर बाबांनी आपल्या भक्तांना वेळोवेळी सांगितलेच परंतु त्यांचा सदुपयोग करून त्यांना आपले षड्मित्र बनविण्याचा एक अत्यंत उत्तम उपाय अध्याय २४ मध्ये सांगितला—

काम तरी मद्विषयींच कामावे। कोप आल्या मजवरीच कोपावे।
अभिमान दुराग्रह समर्पावे। भक्तीं वहावे मत्पदी ॥ ४८ ॥
काम क्रोध अभिमान। वृत्ती जव उठती कडकडून।
मी एक लक्ष्य लक्षून। मजवरी निक्षून सोडाव्या ॥ ४९ ॥
क्रमेंक्रमें येणेंपरी। वृत्ति निकृतन करील हरी।
मग या विखारत्रयाच्या लहरी। तो परिहरील गोविंद ॥ ५० ॥

# आध्यात्मिक मार्गात नादब्रम्हाची उपासना

— डॉ. रा. सी. कापडी एम्. बी. बी. एस्.
वसुंधरा, १३ वा रस्ता राजारामपुरी, कोल्हापूर

卐



卐

● एकदा एक रोहिला बाबांच्या आज्ञेने मशिदीत राहिला होता. तो बाबांचा फार आवडता होता. तो कुराणातील कलमे उच्चस्वरात म्हणत असे. त्याच्या पढण्यात धरबंध नसे. आपल्या लहरीप्रमाणे अहोरात्र वाटेल तेव्हा तो कलमे म्हणे लोक दमून भागून आले असले व त्यांची झोपेची वेळ असली, तरी त्याच्या म्हणण्यात खंड पडायचा नाही. शेवटी लोक कंटाळले आणि त्यांनी बाबांकडे गाऱ्हाणे घातले.

बाबांना माहित होते की, कुराणातील कलमे म्हणजे हिंदूधर्मातील –

ॐ भूर्भुवः स्वः । तत्सं वितुर्वरण्यं भर्गो देवस्य धीमहि ।

या गायत्री मंत्राप्रमाणे ईश्वराचे स्तुतीस्तोत्र आहे. गायत्रीमंत्रसुद्धा अनेक ब्राह्मण एकत्र जमून उच्चस्वरात म्हणतात. त्यातला हेतू आपण लक्षात घेतला पाहिजे. श्रद्धेने लयबद्धतेने जर ईश्वराची स्तुतीस्तोत्रे म्हटली तर वातावरण पवित्र, प्रसन्न, मंगलमय होते. गायत्री हा तेजाचा मंत्र आहे. तसाच बौद्ध धर्मातील ॐ मणी पद्मे हुम हा सुद्धा तसाच एक मंत्र आहे. कुराणातील कलमेसुद्धा वातावरण प्रसन्न करणारी स्तोत्रे आहेत. म्हणून मशिदीतील पहाटे बांग ठोकणारा काजी उच्चस्वरात लोकांना जागृत करत असला तरी आपल्या साखर झोपेला अडथळा होतो असे म्हणण्यात काय अर्थ

आहे ? भारत हे धर्मातीत राष्ट्र असे शासनाने घोषित केले आहे. मुळचा हिंदुधर्म हा सहिष्णु वर्धमान धर्म आहे. त्याने मुस्लीम, बौद्ध, जैन, लिंगायत, फारशी वगैरे अनेक धर्म सामावून घेतले आहेत. हिंदुधर्माने सामंजस पणा दाखविला आहे.

साईबाबांचा अवतार तर त्या काळात हिंदु मुस्लीम धर्मांत वाढत असलेली तेढ थांबवून ऐक्य साधण्या करताच झाला होता. म्हणून साईबाबा हे हिंदु की मुस्लीम हा प्रश्न त्यांच्या निर्वाणापर्यंत त्यांनी गुलदस्तात ठेवला. असो हिंदु की यवन/उभयतास समसमान/जाहले आयुर्दाय पर्यालोचन। ते हे देवार्चन शिर्डीचे अ ११/२२ या उताऱ्यावरून बाबांच्या अवतार कार्याचे स्पष्टीकरण होते. बाबांकडे शिर्डीवासियानी नेलेली तक्रार निरर्थक होती. बाबा म्हणाले जावे न कोणी त्याच्या वाटे । ओरडू द्या मुक्तकंठे । ही ओरड देणे परी । आहे मज बहुहित कारी । पेसा हा रोहिला परोपकारी बहु सुखकारी मजलागी ॥ बाबांच्या दृष्टीने नादब्रम्हाची उपासना ही आत्मबळ किंवा आत्मशांती वाढविणारे अमोघ साधन आहे. स्तोत्र व विजाक्षर मंत्राप्रमाणेच संगीत हे सुद्धा नादब्रह्माची उपासनाच आहे. म्हणूनच शिर्डीच्या समाधी मंदीरात गायनकला निपुण गवयाची कायमची नेमणूक केलेली आहे.

संगीतातील विशिष्ट स्वराच्या स्पंदनाने निर्माण होणाऱ्या ध्वनीलहरीचा वातावरणात व माणसाच्या मनावर-मज्जातंतूवर व पर्यायाने आत्म्यावर फार चांगला परिणाम होतो. या शिवाय संगीत हे मानसिक आरोग्य व सामर्थ्य निर्माण करणारे, जीवनाला आनंद व चैतन्य वाढविणारे शक्तिशाली साधन ऋषीमुनींनी शब्दब्रह्माच्या उपासनेसाठी काही शक्तिगर्भ समुच्चय म्हणजेच बिजमंत्र करून ठेविले आहेत. उदाहरणार्थ ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' हा भागवत धर्मियांचा प्रसिद्ध मंत्र आहे.

हावर्ड डी स्टॅगल या अमेरिकन शास्त्रज्ञाने गायत्री मंत्राने वातावरणात दोन ते अडीच हजार ध्वनीलहरींचा ध्वनी-कंपनाच्या यंत्राच्या साहाय्याने नोंद करुन ठेविली आहे. ' ललिता-सहस्र-नाम हे प्रसिद्ध संस्कृत स्तोत्र आहे. ह्या स्तोत्राच्या नित्य पठणाने मेंदूची दुर्बलता, मानसिक विकृती निराशा इत्यादी रोग नाहीसे होतात असे संगीत तज्ञाने लिहून ठेविले आहे.

पुरुषसूक्त अथर्वशीर्ष, व्यंकटेश स्तोत्र, रामरक्षा, शनिमहात्म, मनाचे श्लोक वगैरे स्तोत्रेसुद्धा वरील पंक्तीला बसतात. आसावरी संगीताच्या स्वर चिंतनाने पौरुषहिनता नाहीशी होते. पूरिया रागाच्या स्वरसेवनाने रक्तदाब कमी करता येतो. विशिष्ट रागरागिणीच्या स्वराने वनस्पतीची वाढही दुप्पट होते असा प्रयोग कोल्हापूरचे एक तत्वज्ञ ग्रहस्थ दत्ता बाळ यांनी करुन दाखविला आहे.

संगीत ही विश्वभाषा आहे. संगीतातील स्वर स्पंदनाने मग ते संगीत कोणत्याही भाषेतील असो मज्जातंतूवर अंतरमनावर अमोल, अमाप परिणाम होतो म्हणून साईबाबांनी प्रथम सांगितलेल्या रोहिल्याच्या उच्चस्वरातील कुराणातील कलमाना प्रतिबंध केला नाही.

दिल्लीच्या शेरशहा बादशाच्या पदरी गवयांचा तांडा ठेवलेला असे. कारण त्याची डोकेदुखी संगीताने बरी होत असे. उत्कटरितीने आळविलेल्या भक्तिगीताने रामकृष्ण परमहंसाची समाधी लागत असे. कबीर, मिराबाई, गुजराथचा संत कवी पुरंदर–दास नरसी मेहता, तुकाराम, रामदास यांचे अवघे जीवन संगीतमय होते. अनन्य भावनेने आळविलेल्या सुरांचा आंतरभावनेवर अनन्यसाधारण परिणाम होतो. प्रसिद्ध जज्ज प्रवचनकार श्री. रानडे (गुरुदेव नव्हे) हे त्यांच्या देवपुजेच्या वेळी तन्मयतेने म्हटलेल्या स्तोत्रांनी रोमांच उभे राहातात असा आपला अनुभव सांगतात. संगीतातील दीपरागाने दीप उजळतात. मेघमल्हारी रागाने आकाशात मेघांचा गडगडात होतो. पाऊसाचा वर्षाव होतो. इंग्लंड, अमेरिकेत हॉस्पिटलातून रेकॉर्ड लावून मानसिक रोग बरे करता येतात हे सिद्ध झाले आहे. तुरुंगातील कैद्यावरही संगीताचा परिणाम होऊन त्यांची वृत्ती बदलते असा पाश्चात्य देशात अनुभव आहे. माझा एक पुतण्या विनायक महादेव कापडी हा मुंबईत संगीत शिक्षक आहे. तो ॐकाराचा खणातील स्वरात सूर लावून ब्लडप्रेशर कमी करतो. हे प्रात्यक्षिक त्याने मला करून दाखविले. पाश्चात देशातील कारखान्यात संगीताच्या सूरावर कर्मचाऱ्याची कार्यक्षमता व कामाचा उरक दुपटीने होतो हे सिद्ध करून दाखविले आहे. गाई दोहनाच्या वेळी जर उत्तम संगीताच्या रेकॉर्डस लावल्या तर दुग्धोत्पादन जास्त होते हे सुद्धा सिद्ध झाले आहे. पाश्चात्य संगीतापेक्षा भारतीय संगीत अधिक शास्त्रशुद्ध, प्रगत व समृद्ध आहे. भारतीय रागरागिणीची रचना हेतूपूर्वक केलेली आहे. भारतीय रागाना स्वतःचा घाट व थाट आहे. चार वेदापैकी सामवेद हा संगीताची उभारणी करणारा वेद आहे. प्रेमाइतकीच मानवी जीवनातील प्रभावी शक्ति म्हणजे संगीत! ज्योतिष शास्त्रातसुद्धा संगीताला प्राधान्य दिले आहे. प्रत्येक स्वरावर कोणत्या ग्रहाचा अम्मल आहे हे ज्योतिष शास्त्राने निश्चित केले आहे. कुंडली पाहून व्याधिहरणासाठी कोणत्या रागाचा अनुकूल परिणाम होईल हे अचूक सांगता येते. एक यशस्वी उपचार व प्रभावी साधन म्हणून संगीताचे साह्य घेता येते. मंत्रजागराच्या घोष गायनाने वातावरण निर्मळ व मंगल होते म्हणून साईबाबांनी रोहिल्याला जवळ केले होते. बाबांनी निर्वाण समयापूर्वी वझे नावाच्या ब्राह्मणाकडून राम विजय वाचून घेतला होता. मरणाद्वारी पोहचलेल्या माणसाला ऐकू येईल असा भगवत् गीतेतील विशेषता बारावा अध्याय म्हटला जातो. सर्वांना सहज व सुलभतेने आचरता येणारा विश्वधर्म

म्हणजे सुरावर म्हटलेली प्रार्थना. मुस्लीम धर्मबंधु कोणत्याही परिस्थितीत चार वेळा तरी गुडघे टेकून प्रार्थना करतात. हिंदुधर्मातही तिन्ही त्रिकाल आरतीच्या रूपाने प्रार्थना करतात. महात्मा गांधीनी राष्ट्र उन्नतीसाठी सामूदायिक प्रार्थना करण्याचा प्रघात पाडला. (प्रेअर इज दी एक्सपानशन ऑफ युवरसेल्फ इन दी लिव्हिंग इथर) प्रार्थना म्हणजे जीवन चैतन्यमय अवकाशात अनुभवास येणारा आत्मविकास गेन क्लॉर्क म्हणतो प्रार्थना म्हणजे जीवन साधनेची परमावधी देवाच्या गावाला जाणारी पाऊलवाट! मात्र प्रार्थनेवर अत्यंत उत्कट निष्ठा पाहिजे. प्रार्थनेला काळ वेळ स्थळ यांचे बंधन नसते. प्रार्थनेने अनेक चमत्कार घडतात. द्रौपदीची कौरव सभेत पाच पांडव व भीष्म द्रोणासमक्ष ज्यावेळी अब्रु लुटली जाण्याच्या प्रसंग आला, त्यावेळी द्रौपदीने भगवान कृष्णाची केलेली प्रार्थनाच तिच्या उपयोगी पडली व नेसलेल्या वस्त्राचे प्रचंड ढीगच्या ढीग पडलेले आमसभेत सर्वांना दिसले, हा सुद्धा एक चमत्कार नव्हे काय? वरील उदाहरणावरून जिथं मानवी बुद्धी कुंठीत होते तेथे ईश्वरी सत्तेचा अंमल चलू होतो असं म्हटलं आहे ते खोटे नाही.

प्रत्यक्ष परमेश्वराला प्रार्थनेचे किती महत्व वाटते ते ज्ञानेश्वरीतील खालील ओव्यावरून स्पष्ट दिसते.

तरी तयापासी पांडवा ।
मी हारपला गिंवसावा ।
जेथ नाम घोषु बरवा ।
करिती माझा ॥
कृष्ण विष्णु हरि गोविंद ।
या नामाचे निखद प्रबंध ।
माजी आत्मचर्या विशद ।
उदंड गाती ॥
तो मी वैकुंठी नसे ।
वेळू एक भानुबिंबी न दिसे ।
परि योगियांचीही मानसे उमरडोनि जाय ।

परमेश्वर आपल्या स्तुतीस्तोत्राना इतका लालचावला आहे की तो म्हणतो की एकवेळ मी वैकुंठात नसेन, सूर्य मंडळात नसेन, योग्याच्या आसनाला ओलांडून जाईन परंतु जेथे 'रामकृष्ण हरी गोविंद' या नावाचा भजनात उद्घोष चालला असेल तेथे हटकून सापडेन' थोडक्यात ईश्वराला संगीत इतके प्रीय आहे मग ते कीर्तनातील असो भजनातील असो किंवा रागदारीतील असो त्यात तो इतका दंग होतो की तो आपले

देहभान हरपतो. रागदारीची किमया त्याला किती मोहिनी घालते हे खालील गोष्टी-वरुन दिसून येईल.

## केदार रागाची किमया

नरसी मेहेता या नावाचा एक प्रसिद्ध संत आणि कवी कृष्ण भक्तीसाठी प्रसिद्ध होता. 'वैष्णव जन तो' हे महात्मा गांधींचे सामुदायीक प्रार्थनावेळचे आवडते भजन त्याचेच आहे. त्याने भजनात केदार राग आळवून प्रत्यक्ष श्रीकृष्ण परमा-त्म्याला आकर्षीत केले होते. तो निःकांचन असूनसुद्धा परोपकारी होता. एकदा एका गरीब ब्राह्मणाला आपल्या मुलीच्या लग्नासाठी पाचशे रुपयाची गरज लागली. तो ब्राह्मण नरसी मेहताकडे गेला आणि गयावया करुन सावकाराकडून पाचशे रुपये मिळवून देण्याची गळ घातली. ब्राह्मणाची ती दीनवाणी अवस्था पाहून नरसी मेहताचे हृदय द्रवले. ते दोघे सावकाराकडे गेले. सावकार नरसी मेहताला चांगला ओळखत होता. नरसी मेहतानी शब्द टाकताच सावकार म्हणाला पाचशे रुपये तुम्हाला द्यायचे नाहीत तर कोणाला द्यायचे परंतु एक अडचण आहे. आमच्या नेहमीच्या व्यवहारा-प्रमाणे तुम्हाला आमच्या पेढीवर काहीतरी गहाण ठेवावे लागेल. नरसी मेहता म्हणाला मी तर असा निःकांचन। मी काय गहाण ठेवणार? सावकाराला नरसी मेहताची परिक्षाच पहावयाची होती. त्याला माहित होते की भजनात केदार राग आळवून श्रीकृष्णाच्या सगुण मूर्तीला नरसी मेहता आपल्याकडे आकर्षीत करतो.

सावकार चटकन म्हणाला तुझा केदार राग चिठी करुन माझ्याकडे गहाण ठेव ब्राह्मण पाचशे रुपये परत देईपर्यंत तुला केदारराग जाहीररित्या कोठेही आळविता येणार नाही. चिठचपाटी झाली. ब्राह्मणाला पाचशे रुपये मिळाले.

नरसी मेहताच्या विरुद्ध गावात जी एक टोळी होती त्यात सावकार सामील होते पण वरकरणी नामानिराळे. त्या टोळीने राजाकडे गाऱ्हाणे नेले की नरसी मेहता एक भोंदू साधू असून त्याने केदार राग आळवून श्रीकृष्णाशी आपण बोलतो असे खोटे सांगून लोकांना त्याने आपल्या नादी लावले आहे. राजाने नरसी मेहताला बोलावून हुकूम दिला की उद्या रात्री बारा वाजेपर्यंत तुझ्या भजनाने समोर ठेवलेल्या श्रीकृष्ण मूर्तीने त्याच्या हातातील हार तुझ्या गळ्यात घातला नाही तर तुझे डोके उडविले जाईल.

नरसी मेहताची ही परीक्षाच होती. नरसी मेहताने भजनातील संगीताने सर्व वातावरण, निर्मळ हृदय स्पर्शी मंगलमय केले. राजाला देखील पश्चाताप झाला. सर्व श्रोतृवृंद भारावून गेले. रात्रौ बारा वाजायला थोडा अवकाश होता. सर्व लोक हळहळू लागले. मात्र नरसी मेहता अविचलीत होता. त्याला केदार राग आळवीता येत

नव्हता केदार राग आळविल्याशिवाय श्रीकृष्णमूर्ती हालत नव्हती. इतक्यात चमत्कार घडला. सावकाराचे दार ठोठावले गेले. सावकाराकडून पाचशे रुपये घेतलेला ब्राह्मण दत्त म्हणून त्याच्यापुढे उभा राहीला. सावकारापुढे पाचशे रुपये व्याजासह मोजून केदार रागाच्या गहाणखताची चिठी मागू लागला. सावकाराला चिठी देणे भाग पडले. ती चिठी अकस्मात नरसी मेहताच्या पायाजवळ पडली. नरसी मेहताला हर्ष झाला. त्याने केदार राग ताबडतोब म्हणण्यास सुरुवात केली. अचेतन श्रीकृष्णमूर्ती हलू लागली. नरसीच्या गळ्यात मूर्तीच्या हातातील हार पडला. राम कृष्ण हरी गोविंद मुरारी या भजनाचा जल्लोश झाला. राजाने विरोधी टोळीला कडक शिक्षा केली. एवढेच नव्हे तर राजासुद्धा नरसी मेहताचा भक्त बनला.

भक्तीचा मार्ग मुक्तीतून जातो याची राजाला खात्री पटली. साईबाबांनी उभ्या आयुष्यात भक्तीच्या मार्गाचाच अवलंब केलेला आढळून येतो. निर्वाणाच्या वेळी पंढरपूरला असलेल्या गणूदासाला मशीद कोसळून पडली आहे. चल नीघ असा दृष्टांत झाला. गणूदास आपल्या वारकरी भजनी मंडळीसह ताबडतोब शिर्डीला आले आणि खल होऊन समाधीची जागा मुक्रर होईपर्यंत तीन दिवस अहो रात्र भजनाचा फड मांडला यावरून सुद्धा बाबांना भजनाची किती आवड होते हे दिसून येते.


★

# शिरडीचे माणिक व नागपूरचा पाचू हे भक्तांचे कोहिनूर

—डॉ. अ. का. पाठक
पाठकवाडी, गोरेगाव

● सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वतींनी साईबाबांच्याकडे वकील पाठविला तर ताजुद्दीन बाबांच्याकडे डॉक्टर पाठविला. श्री साईबाबांच्या चरणी वकील पोहोचले. व भक्त झाले. ताजुद्दीन बाबांच्या ताज बागेत डॉ. घटकई पोहोचले आणि बाबांचे श्रेष्ठ शागिर्द झाले. वकील आणि डॉक्टरांचे भाग्य उदयास आले.

सद्गुरु अक्कलकोट स्वामींच्या आज्ञेने प्रस्तुत लेखक दि. १७ जानेवारीस ताजबागेत हजर झाले व लगोलग शिरडीच्या दरबारात दि. ३१ जानेवारीस उपस्थित झाले. ताजबागेहून शिरडी दरबारात उड्डाण करण्याचा योगायोग अचानक घडला. कारण ताजुद्दीन बाबा व साईबाबा हे एकमेकांचे बंधू होते.



श्री साईबाबा हे पूर्वाश्रमीचे ब्राह्मण होते तर ताजुद्दीन बाबा हे पूर्वजन्मीचे ब्राह्मण होते. पण दोन्ही संतांनी महान फकीर वेशामध्यें जनता जनार्दनासमोर अवतार घेतला.

शिरडी, शेगाव, शृंगेरी ही त्रिस्थळी यात्रा तद्‌तच श्री साईबाबा, श्री गजानन महाराज, श्री ताजुद्दीन बाबा हे महाराष्ट्राचे ब्रह्मा, विष्णू महेश आहेत. श्री साईबाबा हे संतमुकुटमणी, श्री गजानन महाराज हे संतशिरोमणी तर ताजुद्दीन बाबा हे फकीरांचे कोहिनूर ठरतात. ह्या नागपूरच्या हिऱ्याचे दर्शन ताजबागेत जाऊन जरुर यावे व कृतकृत्य व्हावे.

श्रीसाईबाबा, श्री ताजुद्दीनबाबा व श्री गजानन बाबा हे तीन संत समकालीन होते. शिवकालीन रामदास, तुकाराम, मोरया गोसावी प्रमाणे हे विसाव्या शतकातील ३ महान संत आहेत. ह्यामुळे प्रत्येक शतकात त्रिगुणात्मक श्री दत्तांचा अवतार पूर्ण होतो. श्री विष्णूचा अवतार श्रीसाईनाथ होते. श्री शंकररूपात श्री गजानन महाराज अवतरले. श्री ब्रम्हारूपात ताजुद्दीन बाबा मानावेत.

ताजुद्दीन बाबांच्या दर्ग्यास नागपूरात आग लागली तर शिरडीत साईबाबा आग विझविण्याचा आविर्भाव करू लागले. आश्चर्य म्हणजे ताजबागेतील दर्ग्याला लागलेली आग विझली. आपल्या बंधुच्या दर्ग्याची काळजी सद्गुरु साईनाथ घेत होते.

भक्त डॉ. पवनसकर डॉक्टरीचा अभ्यास करीत होते. त्यावेळी त्यांना एका हिंदू सिद्धाने सहाय्य केले होते, आणि ह्या हिंदू सिद्धाने डॉ. पवनसकरांना ताजूद्दीन बाबांकडे आणून सोडले व तो अदृश्य झाला. आजपर्यंत हा हिंदू सिद्ध अज्ञात आहे. तो सिद्ध पुढे कोठे गेला ? हा यक्ष प्रश्न उभा राहतो. वाचक बंधुनो, तो हिंदू सिद्ध पुढे शिरडीचे साईबाबा म्हणून सुप्रसिद्ध झाला ह्या रहस्यभेद आज वाचकासमोर सादर करीत आहे.

दर्गा हे सामान्यांचे दुर्ग असतात कारण येथे सामान्यांचे रक्षण होते. दर्गा की दुआ ही दुःखाची दबा आहे. सामान्यांना दगा झाला की ते दर्ग्याकडे धाव घेतात. त्याचप्रमाणे सामान्यांना दुःखातून सुखाकडे जाण्याचा मार्ग संतांच्या समाधीत गवसतो. पीराचा दर्गा व संतांची समाधी जन कल्याणाचे कार्य करतात. दर्गा व समाधीचे दरवाजे सर्व जाती, जमाती व धर्मासाठी खुले असतात. पीर व संतांचा धर्म असतो मानवता धर्म, दुःखी जनांचे दुःख नाहीसे करणे, हे त्यांचे ध्येय असते. त्यांची धर्मभेद, जाती भेदास मान्यता नसते. ते भेदातीत असतात. अभेद्य असतात. फक्त ईश्वरास मानून मानव कल्याण साधतात.

श्री साईबाबा व ताजुद्दीन बाबांचे ध्येय होते मानव-कल्याण. श्री गजानन महाराजांनी दादासाहेब खापर्डेना आपल्या पश्चात् श्री साईनाथांकडे जाण्यास सांगितले, त्याप्रमाणे नागपूरचे श्रीमंत बुटी हे श्री साईबाबांचे भक्त झाले.

नागपूरचे रघुजी राजे भोसले हे ताजुद्दीन बाबांचे भक्त व त्यांनी ताज बागेत ताजुद्दीन बाबांचा दर्गा बांधवून घेतला. मात्र नागपूरकर भोसल्यांचे दिवाण श्रीमंत बुटीनी साईबाबांची सेवा केली. ह्याच श्रीमंत बुटीनी शिरडीस समाधी मंदिर बांधले. नागपूरकर राजे भोसले ताजबाग निर्माण करतात व त्यांचा दिवाण शिरडीत साई मंदिर बांधतो. हा योगायोग नव्हे तर हा घनिष्ट संबंध दर्शवितो. म्हणून मी वाचकांपुढे नम्रपणे सादर करतो की शिरडीत ईश्वराचे माणिक होते नागपूरात अल्लाचा पाचू होता पण दोघेही भक्तांचे कोहीनूर होते. ॐ साई.

# श्री संत बाबुराव महाराज

—श्री. मधुसूदन वामन करंबेळकर
रघुनाथ निवास, चेंबूर, गावठाण
मुंबई नं. ४०००७१



● श्रीसमर्थ रघुनाथ उर्फ काकामहाराज पुराणिक धोपेश्वर यांचे शिष्य श्री. अनंत गुंडो उर्फ बाबुराव महाराज करंबेळकर, चेंबूर हे श्री साईनाथ कालीन संत होते. श्री काकामहाराज यांची माहिती ही गतअंती दिलेली आहेच. श्री बाबुराव यांनी २४ वर्षे धोपेश्वरला गुरुगृही राहून पडेल ते काम करून अहोरात्र गुरु सेवा केली. त्यांची फल प्राप्ती म्हणजे ते रामरुप झाले. त्यांचा शिष्य परीवारही बराच होता. श्री साई-शिष्य व भक्त त्यांना फार मानत असत. श्री साईशिष्या श्रीमती चंद्राबाई बोरकर पार्ला ह्या त्यांच्या पत्नीला म्हणजे माझे आजीला बहीण मानीत होत्या. अखेरपर्यंत दोघांचे संबंध जिव्हाळयाचे होते. पार्ल्याला श्रीसाई मंदिर आहे, व चेंबूरला श्री बाबुराव महाराज यांची समाधी असून 'श्रीराम मंदीर' आहे. श्री बाबुराव महाराज यांनी अहोरात्र रामोपासना करून भक्तांना रामोपासनेचा धडा घालून दिला. आजही ते भक्तांना स्वप्नात मार्गदर्शन करतात. त्यांचे निर्वाण होऊन जवळ जवळ ५० वर्षांचा काल झाला. सर्व संत एक आहेत व माझा राम सर्व ठिकाणी भरून राहिला आहे. 'तो करील तेच होईल' त्याला अनन्य शरण जा त्यात कल्याण आहे हा त्यांचा मुख्य उपदेश आहे.

सब संतन की जय

# संत श्री दासगणूमहाराज

—श्री. मुकुंदराव टेकाडे
अभ्यंकर बिल्डिंग,
स्लेटर रोड, ग्रँटरोड, मुं. ७



● 'श्री साईलीलामृत' या श्री. प्रभाकरराव आगासकर यांनी लिहिलेल्या श्री साईबाबांच्या चरित्र ग्रंथात ह. भ. प. दासगणूमहाराज यांचा ओझरता उल्लेख आला आहे. पण त्यावरून त्यांच्या व्यक्तिमत्वाची पुरेशी कल्पना येत नाही. दासगणू हे पोलिस खात्यात नोकरीला होते तरी साईबाबांच्या सांगण्यावरून त्यांनी ही नोकरी कशी सोडली याची हकीकतही उद्‌बोधक आहे. साईबाबांच्या प्रत्यक्ष सहवासात अनेक वर्षे राहिलेले एक जुने भक्त म्हणून दासगणू महाराजांचा निर्देश करता येईल.

साईबाबांचे जीवनचरित्र हा अनेक अलौकिक व तेजस्वी घटनांशी गुंफला गेलेला अनेक पदरी गोफ आहे. या गोफाच्या काही पदरांभोवती सर्वश्री अण्णासाहेब दाभोलकर, नानासाहेब चांदोरकर, खापर्डे अशा अनेक भक्तांच्या आठवणी गुंफल्या गेल्या आहेत, व त्या बहुतेक साईभक्तांना माहित आहेत. परंतु या गोफाच्या एका

पदराभोवती गुंफल्या गेलेल्या दासगणूमहाराजांच्या आठवणी आता आपल्यापुडे मी उलमडून दाखवणार आहे.

'नारायण दत्तात्रय सहस्त्रबुद्धे' उर्फ दासगणू यांचा जन्म ६ जानेवारी १८६८ सूर्योदयाच्यावेळी झाला. थोर संत पुरुषाचा जन्म तपोभूमीतच होत असतो. दासगणूचे मातुल घराणे धार्मिक वृत्तीचे होते. सहस्त्रबुद्धे घराणे तर विठ्ठल भक्त होते. या दोन्ही घराण्यांच्या धार्मिक प्रवृत्तीमुळे योग्य अशी तपोभूमी निर्माण झाली होती. या साऱ्यांचा परिणाम दासगणूंच्यावर झाली व त्यांच्या बालमनावर हरिभक्तीचे बीजारोपण नकळत रुजले गेले. त्यांचे पाळण्यातले नाव 'नारायण' ठेवले असले तरी त्यांचे पोट गणपतीप्रमाणे मोठे असल्यामुळे त्यांना 'गणेश' हे नाव पडले. सहस्त्रबुद्धे कुटुंब अहमदनगरला स्वतःच्या वाड्यात राहात होते. वयाच्या नवव्या वर्षी दासगणूंची मुंज झाली खरी, पण त्यांचे मन विद्याभ्यासात रमेना. त्यांना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी घरच्या मंडळीनी खूप प्रयत्न केला, पण ते सर्व वाया गेले. जेमतेम इंग्रजी चौथीपर्यंतच त्यांचे शालेय शिक्षण होऊ शकले. वयाच्या २१–२२ व्या वर्षी त्यांनी शाळेला रामराम ठोकला. या काळातच त्यांना तमाशाचा नाद लागला व त्यांच्या अंगातील कवित्व शक्तीला वाव मिळून ते लावण्या, पोवाडे रचू लागले.

शाळेला रामराम ठोकल्यावर दासगणू बडोद्याला एका नातेवाईकांकडे गेले. तिथे त्यांनी काही महिने संस्थानात नोकरी केली. त्या सुमारास त्यांचे लग्नही झाले. परंतु नोकरीत मन न रमल्यामुळे नोकरी सोडून ते नगरला परतले. शिक्षण, उद्योगधंदा न करता गावात भटकणे हा दासगणूंचा कार्यक्रम एकत्र कुटुंबातील मंडळींना रुचणारा नव्हता. स्वतःच्या भावजयीकडून मानभंगाचा प्रसंग आल्यामुळे मानी स्वभावाचे दासगणू घरातून बाहेर पडले. नोकरीच्या शोधात असताना त्यांना पोलिस खात्यात शिपायाची नोकरी मिळाली. दासगणूंचे चुलते मामलेदार असल्यामुळे ही नोकरी त्यांना सहजगत्या मिळाली, व त्यांची नेमणूक श्रीगोंदे येथे झाली. ही नोकरी सोडावी म्हणून घरच्या मंडळींनी दासगणूंचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. पण दासगणू राजी झाले नाहीत. पोलिस खात्यात त्यांनी एकूण सुमारे अकरा वर्षे नोकरी केली.

श्रीगोंद्याला श्री वामनशास्त्री इस्लामपूरकर या सत्पुरुषाची दासगणूंची गाठ पडली. पुढे त्याचे परिचयात रूपांतर होऊन दासगणूंनी त्यांच्याकडून मंत्रोपदेश घेतला. गुरुपदेश देताना श्रीसद्‌गुरू वामनशास्त्री यांनी दासगणूंना पंढरपूरची वारी करण्याची आज्ञा केली. सद्‌गुरुचा उपदेश झाल्यानंतरच ते 'दासगणू' या नावाने प्रसिद्धीस आले. नोकरीत असताना व नंतरही पंढरीची वारी दासगणूनी चुकवली नाही.

श्री. नानासाहेब चांदोरकर यांच्या सांगण्यावरून श्री दासगणू प्रथम शिर्डीला गेले. श्री चांदोरकर हे साईबाबांचे परमभक्त होते, व त्यांना तमाशाची आवड असल्यामुळे दासगणूंची व त्यांची मैत्री झाली. दासगणूंनी साईबाबांची एकदातरी भेट घ्यावी असा त्यांनी आग्रह धरला. श्री. चांदोरकर हे कलेक्टर कचेरीत वरिष्ठ हुद्यावर असल्यामुळे त्यांच्या आग्रहानुसार दासगणू त्यांच्याबरोबर प्रथमच शिर्डीला गेले. त्यानंतर ते त्यांचे परमभक्त बनले.

दासगणूंनी जी अनेक संतचरित्रे ओवीबद्ध केली. त्याच्यामागे मुख्यत्वेकरून साईबाबांची प्रेरणा कारणीभूत झाली. त्याचे असे झाले– एक दिवस साईबाबांनी श्री चांदोरकरांना सुचविले, 'नाना, सर्व संत मंडळींना जेवायला बोलीव, चांगली सिद्धता कर. आपल्या गणूवर सर्व संतांना बोलाविण्याचे काम सोपीव. एवढे कर बरं का गणू. तुझे लई कल्याण होईल.' याचा अर्थ असा होता की दासगणूंनी संतचरित्रे लिहावीत. अशा प्रकारे साईबाबांनी दासगणूना संतचरित्रे लिहिण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे त्यांनी भक्तीलीलामृत, भक्तिसारामृत, श्रीगजानन विजय ही ग्रंथांत, संतांची चरित्रे ओवीबद्ध केली. दासगणूंची काव्यप्रतिभा आता संतचरित्रे ओवीबद्ध करण्याकडे वळल्यामुळे त्यांचा लावण्या, कवने रचण्याचा नाद हळुहळु सुटत गेला.

नोकरीमुळे गुन्ह्याच्या तपासासाठी दासगणूंना कधीकधी गावोगाव हिंडावे लागत असे. त्यावेळी त्या गावी किंवा जवळपास होऊन गेलेल्या सत्पुरुषांची चरित्रविषयक माहिती ते गोळा करीत व घरी आल्यावर ओव्यांची रचना करीत. या निमित्ताने ते शिर्डीला बऱ्याचवेळा जाऊन आले. कधीकधी स्वतः साईबाबासुद्धा अमुक अमुक गावी जा असे सुचवीत. दासगणू शिर्डीस आले की साईबाबा म्हणत, "अरे गणू, नोकरी सोडून दे. आपण बूट पुसावयास जन्मलो काय? देवाला तुझी लई काळजी आहे." दासगणूंना हे पटत नसे. ते म्हणत, 'बाबा नोकरी सोडून काय करू? मला कोणाचा आधार नाही.' चांदोरकरांनी त्यांना मदतीचा हात पुढे करून नोकरी सोडावयाला सांगितले. पण दासगणू नोकरीला चिकटून राहिले. पुढे नोकरीमध्ये मानभंगाचे असे काही प्रसंग आले की दासगणूंनी नोकरीचा राजीनामा दिला.

नोकरीचे त्यागपत्र दिल्यावर दासगणू काळजीत पडल्यामुळे साईबाबा त्यांना म्हणाले, 'गणू, देव तुझ्या पाठीमागे असताना तू काळजी कशाला करतोस? तू नांदेडकडे जा. तेथे तुझी सारी व्यवस्था होईल.'

साईबाबांच्या या आज्ञेवरून दासगणू मराठवाड्यात आले व त्यांनी संतचरित्रे लिहिण्याचे काम सुरू केले. सुरवातीला ते काही काळ शिरडीला राहिले होते, व तेथूनच ते मराठवाडयात जाऊन येत. दासगणू कीर्तन करण्यात पारंगत होते. त्यांचा

शिरडीला मुक्काम असताना रामनवमी होती. त्यावेळी त्यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम ठरला. साईबाबांच्या सांगण्यावरून रामनवमीच्या उत्सवाची माळ दासगणूंच्या गळ्यात पडलेली होती. त्यांची प्रकृति चांगली असेपर्यंत शिरडीची वारी त्यांनी कधी चुकवली नाही. अशाच एका उत्सवप्रसंगी दासगणूंनी पांढरा शुभ्र अंगरखा, झिरमिळ्यांची सुरेख पगडी, व करवतीकाठी उपरणे असा कीर्तनकाराला साजेसा पोशाख केला, व कीर्तनास जाण्यापूर्वी साईबाबांच्या पाया पडण्यासाठी आले. त्यांना पाहाताच बाबांनी विचारले, ‘कुठे चाललास रे गणू ?’

‘बाबा, मी कीर्तन करण्यासाठी जातो.’ दासगणू नम्रतेने म्हणाले.

‘अरे, कीर्तनाला असा नवऱ्या मुलासारखा थाटमाट कशाला ? परमार्थाकरता कीर्तन ना ? काढून टाक ते !’

हे बाबांचे बोल ऐकताच दासगणूंनी अंगरखा, व पगडी काढून ठेवली. या घटनेपासून दासगणू उघडया अंगाने एक उपरणे घेऊन कीर्तन करू लागले.


कीर्तनात दासगणूंच्या मागे उभे राहून खडया व गोड आवाजात श्री दामोदर वामन आठवले हे त्यांना साथ करीत. वयाच्या चौदाव्या वर्षी हे दामोदर उर्फ दामूअण्णा दासगणूंच्याकडे राहाण्यास आले व त्यांना ग्रंथलेखनातही मदत करू लागले. गुहागरचा हा हुशार विद्यार्थी पुढे नावारूपास आला त्यास साईबाबांची प्रेरणा कारणीभूत झाली याची हकीकतही मनोरंजक आहे. दासगणूंना संतचरित्रे लिहिण्यासाठी गावोगावी जावे लागत असल्यामुळे त्यांनी आपले परममित्र श्री. नानासाहेब चांदोरकर यांना दामूअण्णाला त्यांच्या घरी ठेवून घेण्याविषयी सुचवले. त्याप्रमाणे दामूअण्णा हे चांदोरकरांकडे काही काळ राहिलेसुद्धा. पुढे एकदा चांदोरकर दामूअण्णासह शिरडीला गेले असताना त्यांना साईबाबा म्हणाले, ‘अरे नाना, हे गणूचे पोरगे, त्याच्याकडे जाऊ दे. तू कशाला ठेवतोस ?’

दासगणूंची भेट झाल्यावर त्यांनाही साईबाबांनी सांगितले, ‘गणू, तुझा मुलगा नानाजवळ कशाला ठेवतोस ? तूच सांभाळ त्याला. आपली काळजी देवाला.’ साईबाबांची आज्ञा मानून दासगणूंनी दामूअण्णांना आपल्याजवळ ठेवले.

अशा आहेत या थोर सत्पुरुषाच्या आठवणी. या थोर संतकवीचे २६ नोव्हेंबर १९६२ रोजी देहावसान झाले. त्यांनी रचलेले ‘साईनाथ स्तवन मंजिरी’ हे १६३ ओव्यांचे छोटेखानी स्तोत्र प्रासादिक व लोकप्रिय आहे. हे स्तोत्र श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्यातर्फे प्रकाशित झाले असून त्याच्या दहाहून अधिक आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. शेगांवचे श्री गजानन महाराज यांच्या चरित्रातील अलौकिक घटना रसाळवाणीने त्यांनी एकवीस अध्यायात ओवीबद्ध केले आहेत. याची माहिती मी पुढील लेखातून देण्याचा प्रयत्न करीन. ☆

# तुलसीदासांचे श्री रामचरीत मानस

—सौ. कुसुमताई जोग
आंग्रेवाडी, मुंबई ४



● श्री रामचरित मानस एक अलौलिक ग्रंथ आहे. महाराष्ट्राला भाषेमुळे तो ग्रंथ कळत नाही. याची सुरवात ' वर्णाना अर्थ संघाना ' म्हणजे ह्यात वं बीज आहे व शेवट ' विनिश्चितं ' ह्याने होते. वं हे अमृत बीज आहे. म्हणजे सबंध ग्रंथ अमृतमय झाला आहे जो जो त्याचा अभ्यास करावा तो तो दिव्य स्वर्गीय आनंद मिळतो. मन तल्लीन होते व ग्रंथ खाली ठेवू नये असे वाटते ! हे अमृत किती प्यावे व पिऊ नये असे होते. ह्यात एवढे आहे तरी काय असा सर्वांना प्रश्न पडेल.

उत्तर हिंदुस्तानात घरोघर ह्या ग्रंथाची पारायणे होतात. त्यात भगवंताच्या दिव्य लीला आहेतच पण मन तल्लीन करण्याचे त्यात जबरदस्त सामर्थ्य आहे. हे मन फारच चंचल त्याला आवरण्याचे ऋषिमुनींनी, देवादिकांनी, साधकांनी खूप प्रयत्न केले, पण ताब्यात रहात नाही. हा अनुभव आहे. पण ह्या ग्रंथात अशी दिव्य

शक्ती आहे की, ते चंचल मन जशी जशी तुम्ही पारायणे कराल तसे तसे मन एकाग्र होते, व आजुबाजूचे भान रहात नाही. कथा भागाशी तल्लीन होते, हे असे वाचकांचे का होते तर तो ग्रंथ तसाच आहे. श्री तुलसीदासांची तशीच योग्यता होती. प्रेमभक्तीने तर अंतःकरण त्यांचे इतके थबथबलेले होते की, जागोजाग त्याची प्रचीती येते. श्रीरामायणाच्या आरतीत तर 'सब ग्रंथन को रस' असे म्हटले आहे.

त्यांना प्रत्यक्ष श्रीहनुमंतानी रामायण लिहिण्यास सांगितले. श्रीशंकराच्या वर काम देवाने धनुष्य रोखले त्यावेळी "धरी न काहूँधीर। सबके मन मनसिज हरे" हा अर्धा सोरटा लिहिल्यावर गोस्वामीना चिंता झाली की, 'काहूँ औ सबके में' नारदादी ऋषि पण विरक्त आले. त्यांना काम विकार स्पर्श पण करत नाही. आता काय करावे. तांबडतोब श्रीहनुमंताचे स्मरण केले. ताबडतोब श्रीहनुमंत प्रगट झाले व पुढचा चरण लिहिला की, 'जे राखे रघुबीरते। उबरे तेहि काल महूँना अशा तऱ्हेने श्रीरामायण लिहिले गेल्यामुळे त्याच्यात फार भारी शक्ति आली आहे.

प्रत्येक चौपाई, दोहे मंत्र आहेत. श्रद्धाळू लोक त्याचे पाठ करतात. त्यांना त्याचे फळ पण मिळते अयोध्येत ५ हजार राम मंदिरात त्याचे रोज पाठ होतात. सबंध उत्तर भारत श्री तुलसीदासानी पादाक्रांत केला आहे. श्री वाल्मिकीना श्रीराम प्रभूनी (अयोध्याकांड) कुठे राहू म्हणून विचारले तर त्यांनी १४ स्थाने सांगितली. प्रत्येक कांडात २–२ स्थाने आहेत. त्याचाशोध (तज्ञानानंद सरस्वतीनी) लावला १॥ पहिले स्थान उभा–जिन्हके श्रवन समुद्र समाना २ दुसरे–लोचन चातक जिन्ह करिराखे (मनुशतरूपा) ३ तिसरे दशरथ–रुपबिंदु जल हो हिंसुरवारी भरत प्रभुप्रसाद पासून चरन राम तीरथ चलि जाहीं'

अरण्य कांड पूर्वार्ध – नारद सबुकरि मागहि एकफल्ह।

नारद – काम कोहमर्द मान नमोहा।

सुग्रीव – सबके प्रिय पासून तुम्हहि छाडि गति।

अंगदा दिरामदूत – जननीसम जानहीं परनारी जिन्हहि राम तुम्ह प्रानपि आरे हनुमान दोहा १३०।

बिभीषण : अवगुनतजी पासून नीतिनिपुन जिन करू जगलीका।

जलनिधी : गुन तुम्हारपासून राम भगति रामभगतिप्रिय।

कपिसेना : जातिपाँति धनुधरम बडाई ते सबतजि तुम्हहि रहई ऊरलाई।

सनकापि : सरगुनरकुपासून राम करहुते हिकेऊरडेराकाक भृशुंडी १३१ दोहा।

श्रीशंकर पार्वतीला म्हणतात बिमल कथा हरिपद दायती। भगति होइ ऊनि अन पायनी। बिनुसत संग बिबेकन होई। रामकृपा बिनु सुलभ नसोई।

महाराष्ट्रीयानी हे रामायण घरोघर वाचावे. त्यातले मर्म समजून घ्यावे, व प्रेम-भक्तित तल्लीन होऊन जावे. मनक्रम बचन छाँडि चतुराई। भजतकृपा करिहहिं रघुराई।

मराठी माणसाना भाषेमुळे हा ग्रंथ जवळचा वाटत नाही. त्याची अवधी भाषा आहे पण कळायला सोपी आहे. श्रीशंकर पार्वतीला सांगतात 'गिरिजासंत समागम सम न लाभ कछुआन बिनुहरिकृपा न होइ सो गावहि बेद पुरान.'

संत सर्व काळात सर्व देशात आहेत. पण त्यांची ओळख पटत नाही, अमुक एक व्यक्ती संत आहे हे कळत नाही. जो सत्पदार्थ परमात्म्याच्या स्वरुपाला (यथार्थ तत्वाला) जाणतो संत, काकभुशुंडि गरूडाला म्हणतात.

'आजु धन्य मैं धन्य अति। जद्यपि सबविधिहीन।'
निज जन जानि राम मोहि। संत समागम दीन ।।

ह्याप्रमाणे श्री तुलसी रामायण वाचले म्हणजे सत् संग तर होतोच पण अति दुर्लभ अशी 'हरिपदरति' होते हे रामायण नाट्य महाकाव्य आहे. कल्याण मासिकात वरचेवर रामायणाबद्दल खूप माहिती येते. तिकडे त्याचा खूप अभ्यास चालतो. श्री तुलसीदासांचे प्रकांड पांडित्याचे दर्शन सर्व ग्रंथात होते. मधुसूदन सरस्वतीनी म्हटले आहे की 'इस काशी रूपी आनंद बन में तुलसीदास चलता फिरता तुलसी का पौधा है। उसकी कवितारूपी मंजरी बडीही सुंदर है जिसपर श्रीरामरूपी भँवरा सदा मँडराया करता है। त्या काळात मधुसूदन सरस्वति फार विद्वान पंडीत होते. तुलसी-दासानी ही दिव्य कलाकृति करून लोकांच्यावर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. ह्या ग्रंथावर किती लिहावे तेवढे थोडेच आहे. वाचूनच त्यातला रस चाखावा.

सियावर रामचंद्र की जय

★

# तिसऱ्या टप्प्यावरील कर्करोग श्री साईबाबांच्या कृपेने कमी झाला

—श्री. मनोहर नागेशराव सावंत
'उन्मेष' ८२ सी, जुना प्रभादेवी रस्ता,
वरळी, मुंबई ४०००२६

[ या लेखाचे लेखक साईभक्त श्री. मनोहरपंत सावंत यांना महाराष्ट्रातील एक कर्तबगार व्यक्ती म्हणून ओळखले जाते. श्री साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त व श्री साईलीला मासिकाचे भूतपूर्व संपादक श्री. नागेशराव सावंत यांचे ते ज्येष्ठ चिरंजीव होत. आपले शिक्षण आटोपल्यावर त्यांनी १९५२ साली बेळगावला एस.टीत असि. ट्रॅफिक सुपरिंटेंडेंट म्हणून नोकरीस सुरुवात केली. नाशिक, कोल्हापूर, बडोदा, अहमदनगर, औरंगाबाद, अलिबाग, सातारा, सांगली, नागपूर, मुंबई, ठाणे इ. महत्वाच्या शहरी त्यांनी आपल्या सेवेचा व ज्ञानाचा लाभ दिला सिडकोने पण त्यांच्या ज्ञानाचा भरपूर उपयोग करून घेतला. सध्या श्री. मनोहरपंत महाराष्ट्र राज्य पर्यटण विभागाचे एक उच्च अधिकारी असून त्यांचा उपयोग आज शासन पण करून घेत आहे.—का. संपादक ]

● श्री साईबाबा संस्थानच्या साईलीला मासिकाच्या ६१ साव्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने साईलीला मासिकाचे भूतपूर्व संपादक व श्री साईबाबा संस्थानचे माजी कार्यकारी विश्वस्त कै. नागेशराव आत्माराम सावंत यांच्या स्वतःच्या अनुभवासंबधी दोन शब्द लिहिणे समयोचित होईल असे वाटते.

कै. नागेशराव सावंत हे सन १९२४ पासून श्री साईबाबांचे निस्सिम भक्त होते. आपल्या घरात जे काही चांगले अथवा वाईट घडते ते केवळ प्रत्यक्ष साईबाबाच आपल्या चांगल्या करता करीत आहेत अशी त्यांची भावना होती. तोच वारसा त्यांच्या सर्व कुटुंबियानी, मुलांनी, मुलींनी व नातवंडानी पुढे चालू ठेवला आहे. मी १० ते १२ वर्षांचा असताना सन १९३५ च्या दरम्यान मला आठवते

की दसऱ्याला श्री साईबाबांच्या पुण्य तिथीला आम्ही ५।६ कुटुंबेच येत असू. दिक्षीत वाड्यातील डाव्या बाजूचा हॉल पहिल्या माळ्यावरील मोठा हॉल उजवीकडील दोन खोल्या व मंदिरात डावीकडे असलेल्या मागील दोन खोल्या एवढ्याच आम्हा सर्व कुटुंबाना राहाण्यासाठी पुरत असत. श्री साईबाबांच्या मंदिराला लागून पाठीमागच्या बाजूस असलेल्या बाथरुममध्ये आम्ही आंघोळ करीत असू. त्याकाळी श्री साईबाबा ट्रस्टचा कारभार फारच लहान प्रमाणात होता.

कै. नागेशराव सावंत सन १९७४ मध्ये पोट दुखीने आजारी होते. दुखणे साधे नसावे असे वाटल्यावरून आमचे फॅमिली डॉक्टर व कै. नागेशराव यांना पित्यासमान मानणारे डॉ. एम. डी. देसाई, चामारबागरोड परेल यांना त्यांनी मोठ्या डॉक्टरांकडून तपासून घेतले व फोटो सुद्धा काढला. आमच्या दुर्दैवाने त्यांचे दुखणे हे वरिष्ठ डॉक्टरांनी तिसऱ्या टप्प्याला गेलेला कॅन्सर आहे असे सांगितले. त्यांना परळ येथील टाटा मेमोरीयल हॉस्पीटलमध्ये दाखल केले व ५/६ दिवसा नंतरची ऑपरेशनची तारीख ठरविली. तो एप्रिल / मे १९७४ चा सुमार असावा. माझी पोस्टींग त्यावेळी नागपूरला होती. मी मोठा मुलगा म्हणून माझ्यावर त्यांचा माझ्या इतर भावंडापेक्षा जास्त विश्वास. त्यांनी सर्वांना सांगितले की 'भाई' (म्हणजे मी) आल्याशिवाय ऑपरेशन करावयाचे नाही. त्यांच्या ऑपरेशनपूर्वी अर्थात् मी नागपूरहून मुंबईला येणार होतोच. पण मला वरील निरोप आला व ऑपरेशनच्या आदल्या दिवशी सकाळी मी मुंबईला आलो. लगेच वडिलांना टाटा हॉस्पिटलमध्ये जाऊन भेटलो. कॅन्सरचे ऑपरेशन दुसऱ्या दिवशी सकाळी करावयाचे होते. वडिलांना भेटल्यावर ते मला म्हणाले "भाई, तू आलास बरे झाले. मला हे ऑपरेशन करावयाचे नाही. मी तसाच बरा होणार आहे! डॉ. देसाई अर्थात या गोष्टीला तयार नव्हते. तरीपण मी त्यांना म्हणालो, की साहेबांची (आम्ही सर्व मुले व जवळचे नातेवाईक त्यांना साहेब म्हणत असू) ईच्छा नाही तर ऑपरेशन करुया नको. माझ्या निश्चितपणे घेतलेल्या निर्णयामुळे कोणीच काही बोलू शकले नाही. टाटा मेमोरियलच्या डॉक्टरनी मात्र माझ्याकडून 'रोग्याला स्वतःच्या जबाबदारीवर ऑपरेशन न करिता घेऊन जात आहोत असे लिहून घेतले. लगेच आमच्या वडिलांना घेऊन मी थेट नागपूरला आलो.

एप्रिल / मे १९७४ ते जानेवारी १९७६ म्हणजे १ ३/४ वर्षांहून अधिक काळ तिसऱ्या स्टेजला गेलेला कॅन्सर असूनही कै. नागेशराव हयात होते इतकेच नव्हे तर त्यांची स्वतःची ईच्छा शक्ती (Will Power) व श्रीसाईबाबांवर असलेली नितांत भक्ती या दोन गोष्टींमुळे व त्या जोडीला नेहमीची औषधे यावर त्यांचा कॅन्स-

# श्री साईपरिवार वृत्तविशेष

126

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

साई सेवक मंडळ मुंबई या साई संस्थेतील तरुणांनी गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही मुंबई ते शिरडी पदयात्रेचा कार्यक्रम यशस्वी पार पाडला. दिनांक २४–३–८२ रोजी साईनिकेतन दादरहून ठीक ४ वा. पालखी निघाली व ती ३१ मार्च ८२ रोजी शिरडीस पोचली.

× × ×

श्रीसद्गुरु नारायण बाबा व त्यांच्या शिष्यगणांनी श्री साईबाबा उपदेश प्रचारासाठी दक्षिण भारताची यात्रा स्कूटर वरून केली. २१–२–८२ रोजी सकाळी ११ वा. ही मंडळी कुर्ल्याहून निघाली व २८ मार्च ८२ रोजी सायंकाळी कुर्ला येथे परतली. शिरडी, हुबळी, बंगलोर, तिरुपती, मदुराई, रामेश्वरम, त्रिवेंद्रम धर्मस्थळ, उडपी, गोवा इ. ठिकाणी त्यांनी भेटी दिल्या.

× × ×

आमचे सन्मित्र साईभक्त श्री. गणपतराव सामंत यांचे वडिल गोविंद अर्जुन सामंत हे वयाच्या ८१ व्या वर्षी श्रीदत्तचरणी दि. २७–१–८२ रोजी विलीन झाले. श्रीदत्त व श्री साईभक्त म्हणून ते ओळखले जात. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुलगे व दोन मुली असा परिवार असून सर्व सुशिक्षित व सुस्थितीत नांदत आहेत.

ईश्वर मृतात्म्यास शांति देवो ही प्रार्थना.

× × ×

## सौ. शीला गजानन चौबळ साईचरणी विलीन

ठाणे येथील साईभक्त सौ. शीला गजानन चौबळ या शनिवार ता. २४-१-८२ रोजी रात्रौ ११–४५ वाजता थोडयाशा आजाराने निधन पावल्या. गेली १५ वर्षे त्या नित्यनियमाने वर्षातून एकदा शिर्डीला भेट देत असत. ९, १०, ११ जानेवारी १९८२ ला शिर्डीला जाऊन श्री बाबांचे डोळे भरून दर्शन घेऊन, सत्यनारायण, अभिषेक करून त्या परत आल्या व दुसऱ्याच दिवशी म्हणजे १२ जानेवारीला किरकोळ आजारी झाल्या व त्यातच त्या २४–१–१९८२ रोजी साईचरणी विलीन झाल्या.

श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती वद्गती देवो.

× × ×

साईभक्त, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर व एस. टी. महामंडळाचे माजी अध्यक्ष श्री. बी. एन. आडारकर यांच्या पुतणीचे यजमान व परमसाईभक्त श्री. अनंत केशव गावस्कर १५–२–८२ रोजी श्रीसाईचरणी विलीन झाले. नवी दिल्ली येथे मध्यवर्ती सरकारच्या मुद्रणालयाचे ते व्यवस्थापक होते तसेच तेथल्या साईसमाजाचे ते एक संस्थापक होते.

रचा असाध्य रोग कमी झाला. या गोष्टीवर कोणाचाही विश्वास बसणे अशक्य आहे" पण १९७५ मध्ये एप्रिल / मे मध्ये टाटा मेमोरीयलमध्ये आमच्या वडिलांची पुन्हा तपासणी करून घेतली व फोटो काढला असता १९७४ चा रिपोर्ट पाहून तपासणारे डॉक्टरही आश्चर्यचकित झाले. ऑपरेशन शिवाय कॅन्सरचा तिसऱ्या टप्प्यावर गेलेला असाध्य रोग केवळ साईबाबांची उदी व तिर्थ यावर कमी होऊ शकतो या गोष्टीवर त्यांचा विश्वासच बसू शकेना मात्र असे घडले खरे. या दरम्यान आमचे वडिल माझ्याकडे नागपूरला, शिर्डीला गुरुपादुकामागील खोली क्र. ३१ अगर मुंबईला माझा भाऊ श्री. नरेंद्र यांच्याकडे घाटकोपरला वास्तव्य करीत असत.

डिसेंबर १९७५ मध्ये नागपूरला माझ्याकडेच असताना आमचे वडिल घरातच बाथरुममध्ये पडले, त्यांच्या कमरेखालील हाड मोडले. त्यांचे त्यावेळी वय ८१ वर्षांहून अधिक होते. नागपूर येथील आर्थोपेडिक सर्जन डॉ. बाभुळकर म्हणाले या वयात त्यांचे ऑपरेशन करून उपयोग होणार नाही, व निष्कारण मात्र त्रास होईल, म्हणून ऑपरेशन केले नाही. सुमारे ३ आठवड्यानंतर आमच्या वडिलांचे डॉ. बाभुळकर यांच्या हॉस्पिटलमध्ये गुरुवारी ता. ८ जानेवारी ७६ रोजी पहाटे निधन झाले.

आमच्या वडिलांची जीवनज्योत वास्तविक ४७ वर्षांपूर्वीच मालविली गेली असती. पण केवळ श्रीसाईबाबांच्या कृपेने सन १९२९ मध्ये ते मृत्युच्या दारातून अक्षरशः परत आले. कै. नागेशराव त्यावेळी मुंबई पोलिस खात्यामध्ये सबइन्स्पेक्टर या हुद्यावर होते. त्या काळात हिंदू-मुसलमान दंगे होत. अशाच एका दंग्याच्या वेळी आमच्या वडिलांची नेमणूक नळबाजार या दंगल ग्रस्त भागात झालेली होती. पहाऱ्यावर असताना दिवसभर त्यांची प्रकृती उत्तम होती. पण अचानक दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अस्वस्थ वाटू लागले. त्यांनी ही गोष्ट आपले वरिष्ठांच्या कानावर घातली. वरिष्ठांनी त्यांना घरी जाण्यास सांगितले व त्यांच्या जागी एक सार्जेंट ( त्याकाळी युरोपियन सबइन्स्पेक्टर यांना सार्जेंट म्हणत असत. ) श्री. प्रिस्टले यांची नेमणूक केली. आमचे वडिल घरी आले. घरी आल्यावर त्यांना बरे वाटू लागले. पण तासभरातच संध्याकाळी पाचच्या सुमारास नळबाजार येथे अचानक दंगल उसळल्याचे समजले व दंगलखोरांनी श्री. प्रिस्टले यांना ठार मारले. श्री. साईबाबांची कृपा नसती तर आमचे वडील १९२९ मध्येच मृत्युमुखी पडले असते व कदाचित त्यांच्या संबंधीची माहिती नंतरच्या काळात इतर लोकांना समजलीही नसती. ही सारी श्रीसाईबाबांचीच कृपा होय असे आम्हास वाटते.

# भारतातील श्रीसाईबाबांची मंदिरे

[ असंख्य साईभक्तांनी केलेल्या मागणीमुळे मोठ्या कष्टाने व परिश्रमाने संग्रहीत केलेली ही सूची या अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. आमच्या असंख्य भक्तांना ही सूची नक्कीच संग्राह्य वाटेल. का. सं. ]

१) श्रीसाईबाबा समाधीमंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान,
— मु. पो. शिरडी, ता. कोपरगाव, जिल्हा अहमदनगर पिन–४२३१०९

२) श्रीसाई निकेतन — साईनिकेतन दुसरा मजला ८०४ बी. डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुं. ४०००१४

३) श्रीसाईधाम — साईधामवाडी ( दुआर्ट लेन ), शापुरजी भरुचा बागे समोर, व्ही. पी. रोड, गिरगाव, मुं. ४००००४

४) श्रीसाई प्रेमळ विठ्ठल मंदिर — फणसवाडी, मुं. ४००००२

५) श्रीसाईबाबा मंदिर — फोरजेट हिल, नानाचौक, मुं. ४००००७

६) श्री भगवती साई संस्थान [ श्रीनारायणबाबा ] — कुर्ला रेल्वेयार्ड समोर ९२/४ सेंट्रलरेल्वे कॉलनी, मु. पो. कुर्ला मुं. ४०००२४

७) श्रीसाईनाथ मंदिर ( ट्रस्ट ) [ श्रीमोहितेबाबा ] — बी. डी. डी. चाळ नं. २१ व ३० यांचेमधे, गांधी मैदान वरळी, मुं. ४०००१८

८) श्रीताईंचे साईबाबा [ लीलाताई गोलतकर ] — अभंग बिल्डिंग, ( तळमजला ) परळव्हिलेज, परळ, मुं. ४०००१२

९) श्रीसाईनाथ शिवमंदिर — बिल्डिंग क्र. १५ चेंबुर कॉलनी, चेंबुर, मुं. ४०००७४

१०) श्रीसाई–हनुमान मंदिर — हनुमान रोड, मु. पो. विलेपार्ले मुं. दादर

११) श्रीसाईबाबा मंदिर — सेंट्रलरेल्वे स्टेशन जवळ मुंबई ४०००१४

१२) श्रीसाईबाबा मंदिर [ श्री. लिमयेबाबा ] — यशोधन को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, ( ३ रा मजला ) फ्लॉट नं. २०/२१ सितळादेवी टेंपलरोड, माहिम मुंबई ४०००१६

—क्रमशः चालू

# डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर यांची बिनशर्त माफी

[ साईभक्त डॉ. गव्हाणकर यांनी १९८१ साली शिरडी येथे भरलेल्या सातव्या श्रीसाईलीला लेखक-कवी संमेलन प्रसंगी भाषण करताना दिल्लीच्या श्रीसाईबाबा मंदिराबद्दल अनुचित उद्‌गार काढले होते. त्यावर या मंदिराचे संचालक व अध्यक्ष श्री. आर. एस. चिटणीस यांनी दिल्ली न्यायालयात डॉ. गव्हाणकरांच्या विरुद्ध फिर्याद नोंदविली होती आपण जे काही वक्तव्य केले त्याबद्दल लेखी माफी डॉ. गव्हाणकरांनी दिल्ली कोर्टापुढे सादर करुन या वादा वादीवर आता अखेरचा पडदा टाकला आहे. त्यांच्या त्या लेखी माफीचा तर्जुमा, मजकूर प्रसिद्ध करीत आहोत.

— का. सं. ]

मी, डॉ. के. भ. गव्हाणकर रहाणार १५८ इंदिरानिवास, लालबहादूर शास्त्री मार्ग, कुर्ला, मुंबई ४०००७० जाहिररित्या निवेदन करतो की-३ व ४ फेब्रुवारी १९८१ रोजी शिरडी येथे भरलेल्या श्रीसाईलीला सातव्या लेखक-कवी संमेलन प्रसंगी मी दिल्लीच्या श्रीसाईबाबा मंदिराचे संबंधी अनुचित् उद्‌गार काढले होते. "**नवी दिल्ली येथील श्रीसाईभक्त समाजाचे श्रीसाईबाबा मंदिर समगलिंग सेंटर आहे**" असे निरवालस खोटे, बिनबुडाचे, निराधार विधान माझ्या तोंडून गेले याबद्दल मला स्वतःला अतीव दुःख झाले व त्याबद्दल मी येथे बिनशर्त माफी मागतो.

माझ्या वरील धादांत खोठ्या विधानामुळे श्रीसाईभक्त समाज (रजिस्टर्ड) नवी दिल्ली-३ या संस्थेचे अध्यक्ष श्री. आर. एस. चिटणीस, संस्थेचे सर्व सदस्य, सहकारी व कार्यकारी मंडळी यांना पण यामुळे दुःख होऊन त्यांचे कधीही भरून न येणारे नुकसान होऊन त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोचला आहे याची मला पूर्ण जाणीव झाली आहे.

माझ्या या अपराधा बद्दल मी संस्थेचे सध्याचे अध्यक्ष श्री. आर. एस. चिटणीस संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य व सहकारी मंडळी यांची बिनशर्त माफी मागतो व हे माफीचे निवेदनपत्र श्रीसाईभक्त समाजाने भारतात कुठेही प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकात, साताहिकात, मासिकात कोणत्याही भारतीय भाषेतून पत्रकाद्वारे प्रसिद्ध करण्यास मुभा देतो.

—डॉ. के. बी. गव्हाणकर

# साठ वर्षांची अशी ही साईलीला

अजी आनंदाचा सूर्य उगवला,
सारा आसमंत आनंदूनी गेला,
लेखक कवींचा थवा चालला,
शिर्डी गावी संमेलनाला—कारण
आज जाहली साठ वर्षांची ही साईलीला ॥ १ ॥

बावीस साली भाग्य उदेले,
साई कुळी बाळ जन्मले,
साई भक्त गाऊ लागले,
शिर्डी सारे नाचू लागले—कारण
आज जाहली साठ वर्षांची ही साईलीला ॥ २ ॥

कले कलेने बाळ वाढले
साई भक्तांचे आधार बनले,
साई प्रेमा उधान आणिले
नव चैतन्य सर्वां आले—अशी ही
आज जाहली साठ वर्षांची ही साईलीला ॥ ३ ॥

साई श्रद्धेचे लेणे लेऊनी,
साई सबुरीचे बाळकडू पिऊनी,
प्रेमाचे घर हृदयी भरुनी,
आजन्म सेवेचे व्रत हे घेऊनी—अशी ही
आज जाहली साठ वर्षांची ही साईलीला ॥ ४ ॥

साईलीला अमुची आई
सर्वा हृदयी प्रेम गाई
सद्बुद्धीचा बोध देई
साई भक्तांचे गुण गाई—अशी ही
आज जाहली साठ वर्षांची ही साईलीला ॥ ५ ॥

साई भक्त एकच वदती
साई बंधु भगिनी मागती
असो साईलीला सदैव जगती
बाबा साई तथास्तु म्हणती
जगी अमर होईल ही साईलीला
अशी ही जाहली साठ वर्षांची साईलीला ॥ ६ ॥

—डॉ. इंदू नाईक
मुक्ता नर्सिंग होम, सीताकुंज
मुंबई-पुणे रस्ता, लोनावळा, (पश्चिम)

## माफीपत्र

मी एल. बी. मालवणकर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे प्रकाशित होणाऱ्या 'श्रीसाईलीला' या मासिकाच्या इंग्रजी आवृत्तीचा **मुद्रक** या नात्याने येथे पुढील निवेदन जाहिर करण्यास मला अत्यंत दुःख होत आहे व त्याबरोबरच मी स्वतः श्रीसाईभक्त समाज (रजिस्टर्ड) नवी दिल्ली–३ या संस्थेचे अध्यक्ष श्री. आर. एस. चिटणीस, संस्थेचे सदस्य व कार्यकारी मंडळाचे सभासद यांची बिनशर्त माफी मागतो.

श्रीसाईलीला मासिकाच्या में १९८१ च्या इंग्रजी आवृत्तीच्या अंकात पान क्रमांक २२–२३ वर शिर्डी येथे ३ व ४ फेब्रुवारी १९८१ रोजी भरविल्या गेलेल्या श्रीसाईलीला लेखक–कवींच्या मेळाव्यासमोर डॉ. के. बी. गव्हाणकर यांनी केलेल्या भाषणाचा वृत्तांत छापण्यात आला असून '**श्रीसाईबाबा मंदिर नवी दिल्ली–३ हे स्मगलिंग सेंटर आहे**' असे एक वाक्य छापले गेले आहे.

मी साफ साफ सांगतो की, डॉ. के. बी. गव्हाणकर यांनी श्रीसाईबाबा मंदिर नवी दिल्ली–३ या संस्थेसंबंधी केलेले हे विधान **असत्य आणि बिन आधाराचे असून** त्याबद्दल स्वतः डॉ. गव्हाणकरांनी उभयपक्षी केलेल्या लेखी कायदेशीर माफीपत्रात नमूद केले असून त्यांनी ही बिनशर्त माफी मागितली आहे व हा त्यांचा माफीचा मजकूरही याच अंकात इतरत्र प्रसिद्ध केलेला आहे.

**(एल. बी. मालवणकर)**

# साई मुऱ्हाई

[ अहिराणी भाषेतील साईगीत ]

शेजी दये गहू
जात्‌ते वाजस
मुखेना बोलते
साईना बोलस ॥

करु माय शिया
सांजोऱ्या पापड्या
भाऊ साई ऊना
टाका पाय घड्या ॥

काढू पीठ मैदा
पुरनणी पोयीले
साई सौदागर
तूप वाढे खीरले ॥

मी ते दवू गहू
काढू माय रवा
लाडू करंजीले
तेल तूप लावा ॥

लीला म्हने साई
वना व मुऱ्हाई
याले शिरडीले
पलटानी धाई ॥

—सौ. लीला मराठे
काठी बंगला, साक्री रोड धुळे,

# शिरडीत साईराम प्रगटले!

युगायुगातून वाट चालूनी
राम-कृष्ण अवतार घेऊनी
नारायण प्रभू पृथ्वीवरती पुनरपि अवतरले
शिरडीत साईराम प्रगटले ॥

रहीम राम हा एकची मानुनी
अल्ला ईश्वरी इसा पाहुनी
आत्मीयतेची जाणीव देऊनी अजरामर झाले
शिरडीत साईराम प्रगटले ॥

तुम्हा आम्हातील राम दर्शनी
आत्मारामी दंग राहुनी
भक्त जीवनी राम घालूनी रामायण रचिले
शिरडीत साईराम प्रगटले ॥

रामायण या श्री साईंचे
लीला-कृपा उपदेशाचे
फकीरी जीवन जनसेवेचे परिपूर्ण झाले
शिरडीत साईराम प्रगटले ॥

फकीर माना अथवा ईश्वर
हृदयी ठेवा अथवा बाहेर
कृपेचा हा अखंड निर्झर रात्रंदिन चाले
शिरडीत साईराम प्रगटले ॥

**—श्री. रघुनाथ शां, जुन्नरकर**
५ वसंत अपार्टमेंटस, कस्तूर पार्क,
शिंपोली रोड बोरीवली (प.) मुं. ९२

# माफीपत्र

मी क. हि. काकरे श्री साईलीला इंग्रजी व मराठी या दोन्ही आवृत्त्यांचा संपादक या नात्याने येथे पुढील निवेदन जाहीर करण्यास मला अतीव खेद होत आहे. त्याबरोबरच मी स्वतः श्री साईभक्त समाज (रजिस्टर्ड) नवी दिल्ली ३ या संस्थेचे अध्यक्ष श्री. आर. एस. चिटणीस, संस्थेचे सदस्य व कार्यकारी मंडळाचे सभासद यांची बिनशर्त माफी मागतो,

श्री साईलीला मासिकाच्या मे १९८१ च्या इंग्रजी आवृत्तीच्या अंकात पान क्रमांक २२-२३ वर शिरडी येथे ३ व ४ फेब्रुवारी १९८१ रोजी भरविल्या गेलेल्या श्री साईलीला लेखक-कवींच्या मेळाव्यासमोर **डॉ. के. बी. गव्हाणकर** यांनी केलेल्या भाषणाचा वृत्तांत छापण्यात आला असून '**श्री साईबाबा मंदिर नवी दिल्ली-३ हे समगलिंग सेंटर आहे**' असे एक विधान छापले गेले आहे. मी श्री साईबाबा मंदिर नवी दिल्ली-३ येथे दोनदा भेट दिली आहे. श्री साईभक्त समाज या संस्थेचे अध्यक्ष श्री. आर. एस. चिटणीस यांचा माझा खास परिचय आहे.

मी स्पष्टपणे सांगतो की, **डॉ. के. बी. गव्हाणकर** यांनी श्री साईबाबा मंदिर नवी दिल्ली-३ या संस्थेसंबंधी केलेले हे विधान **असत्य आणि बिन आधाराचे** असून त्याबद्दल स्वतः **डॉ. गव्हाणकरांनी** केलेल्या लेखी कायदेशीर माफी पत्रात हे कबूल केले असून त्यांनीही बिनशर्त माफी मागितली आहे व हा त्यांचा माफीचा मजकूरही याच अंकात इतरत्र प्रसिद्ध केलेला आहे.

माझ्या केवळ अनवधानतेमुळे श्रीसाईभक्त समाज (रजिस्टर्ड) नवी दिल्ली-३ या संस्थेचे अगणित व कधीही भरून न येणारे नुकसान होऊन संस्था, संस्थेची कार्यकारी समिती व सदस्य यांचे नाव व दर्जा याला धक्का पोचला आहे याबद्दल मी या मासिकातून त्या सर्वांची बिनशर्त माफी मागतो व साईभक्त समाज नवी दिल्ली-३ यांनी हा मजकूर त्यांच्या निवडीच्या कोणत्याही भारतीय भाषेतून प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकात, मासिकात वृत्तपत्रात कोणत्याही भारतीय भाषेतून प्रसिद्ध करण्यास त्यांना मुभा देतो.

**— क. हि. काकरे**

संपादक

# नाम ध्यान महिमा

साईराम बोलो श्रीसाई शाम बोलो
बडाहि सूख है भक्तों ये साई राम ध्यान में
साई राम बोलो श्री साई श्याम बोलो

संदेश संतोंने ये ही दिया है
नाम ध्यान का बडा महिमा कहा है
नर जन्म दिया जिसने उसी के गुण गालो
साई राम बोलो श्रीसाई शाम बोलो

भक्त प्रल्हाद को जिसने बचाया
जहर का भी जिसने अम्रित बनाया
जो ध्रुव ने लिया था वोहि नाम लेके डोलो
साई राम बोलो श्री साई शाम बोलो

बडा ही सुख है भक्तों ये साईराम ध्यान में
साई राम बोलो श्री साई शाम बोलो

गीत स्वरयोजना—**श्री. जयवंत कुलकर्णी**
१० प्रार्थना समाज रोड
कुलकर्णी कुटीर विलेपारले मुं. ५७

# रामनवमीचा उत्सव

होतो रामनवमीचा उत्सव शिर्डीत
असंख्य नरनारी तिकडे जमतात
भरतो त्यावेळी तिथे मोठा भक्त मेळा
करतात थाटात साईंचा सोहळा ॥ १ ॥

गोदावरीचे आणतात निर कावडीनी
घालतात साईंच्या समाधीवर ते पाणी
अशावेळी येते वेगळे तेज मूर्तीस
होतो मूर्ती सजीव झाल्याचा भास ॥ २ ॥

निघते द्वारकामाईतून पोथीची मिरवणूक
गुरुस्थानी होतो तिचा शेवट
भक्तगण करतो पोथीचे एकेक अध्यायाचे पारायण
दासगणूचे मानसपुत्र आठवले करतात साईचे कीर्तन ॥ ३ ॥

असतो प्रसाद खास सुंठसाखरेचा
लागतो तो अत्यंत स्वादाचा
तिसरे दिनी काल्याला दहीहंडी फोडतात
त्या समई देतात लाड्यांचा प्रसाद ॥ ४ ॥

—सौ. वसुंधरा रा. चोरे
८०३ सी लक्ष्मी भुवन
डॉ. आंबेडकर रोड दादर, मुं. १४

# शुभ संदेश

श्रीसाईलीला मासिकाला साठ वर्षे पूर्ण झाली ही श्रीसाईकृपाच होय. श्री साईंच्या आशीर्वादाने जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आकाशात तळपते राहून लोकांना आनंद देतील तोपर्यंत ही साईलीला भक्तांना आनंद देईल.

अशिक्षितापासून सुशिक्षितापर्यंत या साईलीला मासिकाने बोलते केले आहे. हे मासिक ज्या व्यक्तींनी प्रथम सुरू केले व आता कष्ट घेऊन जे चालवतात त्यांना आमचा प्रेमपूर्वक नमस्कार. बाबांनी त्यांना सुखी ठेवावे. कारण आम्हा भक्तांना त्यामुळे आपली वेडीवाकडी भक्ती व अनुभव मांडता आले.

**डॉ. सुमन-इंदू**, लोणावळा

भगवान श्री साईबाबांच्या साईलीलेची गाथा ६१ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. श्री साईबाबांच्याच कृपेने भक्तांच्या हाती दरमहा पडत असलेल्या या भव्य व दिव्य आध्यात्मिक मासिकाला माझ्या हार्दीक शुभेच्छा.

—सौ. **तारा चेंदवणकर**, चेंबूर

अत्यंत लोकप्रीय अनुभव, प्रचिती व मधुर भक्ती गीतांनी परीपूर्ण असलेले हे श्री साईलीला मासिक ६१ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. सर्व जगभर त्याचा प्रसार होऊन असंख्य भक्तांस त्याचा अलभ्य लाभाचा स्वाद मिळून त्याचा प्लॅटिनम महोत्सव व्हावा हीच श्रीसाई चरणी प्रार्थना.

—सौ. **वसुंधरा रा. चोरे**, दादर

"श्रीसाईलीला" मासिक येत्या रामनवमीच्या शुभमुहुर्तावर ६१ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे याबद्दल धन्यवाद व शुभेच्छा.

श्रीसाईबाबांनी प्रज्वलित केलेली पवित्र धुनी द्वारकामाईत जशी अखंड तेजाने तळपत आहे तद्वतच "श्रीसाईलीला" मासिक अखंड प्रकाशित होत राहो हीच श्रीसाईपदी नम्र प्रार्थना व सदिच्छा.

—श्री. **गणपतराव सामंत** मुंबई.

श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डीच्या वतीने दरमहा प्रसिद्ध होणाऱ्या साईलीला मासिकाने साठ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण केल्याबद्दल आम्ही आपले हार्दिक अभिनंदन करतो.

पूज्य साईबाबांच्या शिकवणुकीनुसार चालणारे, बाबांच्या सेवाकार्याचे आणि भक्तिकार्याचे लोण गेली अनेक वर्षे तळागाळापर्यंत पोहोचवून साहित्याच्या माध्यमातून भक्तिमहिमा फुलवित असल्याचे पाहून समाधान वाटते. किंबहुना यामागे बाबांचीच कृपा, आशिर्वाद निश्चितच असल्याचे जाणवते.

आपली ही वाटचाल मराठी साहित्यात मोलाचीच भर घालीत आहे. या मासिकातून लिहिले जाणारे लेखन, भक्तजनांचे स्वानुभव, साईमहिमा, कवितांतून त्यांचे घडणारे दर्शन, दरवर्षी होणारे संमेलन, बाबांच्या सत्प्रेरणेने लिहिणारे अनेक नवे–जुने कवी–लेखक यांचे एक प्रकारे स्नेहबंध प्रस्थापित झाल्याचेच दिसून येते.

साईलीलेचे ६१ व्या वर्षाच्या पहिल्या अंकाच्या निमित्ताने अभिनंदन करताना मनस्वी आनंद होत आहे. श्रीसाईलीला यापुढेही अशीच प्रगती करो आणि भक्ति ज्योत प्रज्वलित करो हीच सदिच्छा.

संपादक भक्तिसंगम
**सुधाकर सामंत**, दादर

महाविष्णुची स्वारी गरुडावर बसते परंतु गरुड त्यांना वहात नसून तेच गरुडासकट आपल्याला वहात असतात. त्याचप्रमाणे 'श्री साईबाबा संस्थान' मंडळी हा अंक प्रकाशित करीत नसून श्री साईबाबाच आपली लीला आपण करीत आहेत. भक्तांचे हृदयात नित्य जागृत असलेला 'श्री साईराम' भक्त मुखाने साईलीला अंकात दिसतो त्यामुळे बाबा आजही प्रत्यक्ष वावरत आहेत हीच प्रचिती गेले ६१ वर्षे अंकातून दिसते. यंदाचा ६१ व्या वर्षाचा अंक सोहाळा श्री बाबा विशेषत्त्वाने साजरा करीत आहेत तेव्हा भक्तांचे हृदयाला उधाण आल्याशिवाय रहाणार नाही. हा अंक घरोघर जावो. बावांचे पाय प्रत्येकाचे घराला लागोत व नवग्रह युतीचे परीणाम शुभ फलदायी होवोत हीच त्यांचे चरणी प्रार्थना.

—**मधुसूदन वामन करंबेळकर**, मुंबई

सध्याच्या धंदेवाईक व वासना पिडीत मासिकांच्या प्रांतात. आपण श्रीसाईबाबांच्या जीवन कार्याचा–तत्वज्ञानाचा आध्यात्मिक चाकोरीतून गेल्या ६० वर्षांपासून "श्रीसाईलीला" मासिकाद्वारे प्रचार करून, सदर मासिकाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून दिलात या बद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन.

६१ व्या वर्षांत पदार्पण करणाऱ्या 'श्रीसाईलीला' मासिकाची दिवसे–दिवस भरभराट होवो, आणि विश्वाच्या अंतापर्यंत हे मासिक अखंडीत चालू राहो, अशी साईचरणी प्रार्थना,

—**श्री. ग. रा. पालकर** कुर्ला

अध्यात्मिक मराठी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे श्री साईलीला मासिक ६१ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे व पहिला अंक रामनवमी उत्सवाच्या दिवशी म्हणजे १ एप्रिल १९८२ रोजी शिर्डी येथे श्री. अनंतरावजी आठवले यांच्या शुभ हस्ते प्रकाशित होत आहे याबद्दल मी हार्दीक अभिनंदन करतो.

मानवतेच्या महान शिकवणुकीची वाटचाल श्रीसाईलीला मासिक ६० वर्षे अव्याहतपणे करीत आहे.

आपल्या भक्तांना आपली वेळोवेळी आठवण होत रहावी हेच साईलीला मासिकाचे ध्येय आहे. श्रीसाईलीलेचा ध्वज दिव्य तेजाने त्रिखंडात फडकत राहो अशी श्री साईचरणी माझी प्रार्थना.

—श्री. **रमाकांत पंडित**, मुंबई

AUM SHIRDI SAIBABA

Many many humble Greetings and Best wishes to our readers of GOD "Shirdi Saibaba's Magazine 'Sai Leela' (Diamond Jubilee Special Issue).

The Leela of our God 'Shirdi Saibaba' is unlimited and unbounded.

I pray humbly every reader of Sai Leela (marathi) must get.

S – pirituality
A – bility
I – mpartiality
L – oyalty
E – quality
E – quanimity
L – iberty and
A – ctuality through

Sincere prayers faithfully & Self surrender totally daily. May the Grace of our God Shirdi Saibaba bless to eveyone.

Aum Shanti

(Dr. BABAJI)
Delhi

# शिर्डी येथील मंगलकार्यालय उद्घाटन सोहळा

—कु. रेखा दिघे

माझा जो जाहला काया वाचा मने । तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥

या वचनाने श्री साईबाबांनी भक्तांशी अजोड नाते जोडलेले आहे. आपले हितगुज सांगण्यासाठी अनेक भक्त शिर्डीस येतात व आपल्या लाडक्या देवतेचे दर्शन घेऊन जातात. श्री साईबाबांचा महिमाच मुळी अगाध आहे. बाबा म्हणत असत, अरे तुम्ही मला जर एक रुपया दिलात तर त्याची दसपटीने फेड करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. खरोखरीच बाबांच्या दरबारी जो आला तो रिक्त हस्ताने परत कधीच जात नाही.

माझ्या भक्तांचीचे घरी । अन्नवस्त्रा नसे कमी ॥

या वचनाची आठवण आल्याशिवाय रहात नाही.

असेच वारंवार शिर्डीस येणाऱ्या भक्तांना, तेथील सुखसोयी, रहाण्याच्या, जेवणाच्या इ. सोयी जवळून न्याहाळण्याची संधी लाभते. श्री साईबाबांचे परिसरात जेवणाची उत्तम सोय आहे. रहाण्याची सोय जितकी करावी तितकी अपुरी, परंतु भरपूर प्रमाणात आहे. परंतु या परिसरात लग्नादि शुभकार्यासाठी एकही उत्तम कार्यालय नसल्याची रुखरुख, सिक्कीमचे निस्सीम साईभक्त श्री. जे. आर. कॉन्ट्रॅक्टर यांचे मनात खोलवर कुठेतरी होती. त्यांनी आपले मनातील हितगुज, श्री साईबाबांना सांगून त्यांचेकडून आज्ञा मिळवली.

श्री. जे. आर. कॉन्ट्रॅक्टर हे मूळचे गुजरातमधील उधवाडा येथील रहिवासी, प्रत्येक व्यक्तिला सर्व गोष्टींत आपली माता जास्त प्रिय असते. आपल्या आईच्या व साईमाउलीच्या आशिर्वादाने, आपण आज धनिक झालो हे श्री कॉन्ट्रॅक्टर कधीच विसरू शकले नाहीत. त्यांनी आपल्या परमपूज्य मातोश्रींच्या नावे रु. १,५०,०००/– देणगी रुपाने देऊन एक भव्य मंगल कार्यालय बांधून देण्याची इच्छा, त्यावेळचे कोर्ट रिसीव्हर, श्री का. सी. पाठक यांना दर्शविली. श्री. पाठकसाहेब यांनी अर्थातच या गोष्टीचा स्वीकार करून, श्री. कॉन्ट्रॅक्टर यांची इच्छा साईबाबांचे आशिर्वादाने पूर्ण केली.

दिवसेंदिवस वाढती गर्दी, व वाढता व्याप लक्षात घेता असे दिसून आले की, सध्याचे मंगलकार्यालय हे फारच अपुरे पडते आहे. त्यातून मार्ग एवढाच की सध्याचे मंगल कार्यालयाचे वर एक मजला वाढवून, वाढत्या गर्दीला थोड्याफार प्रमाणावर आळा घालणे हे होय. ही आपली इच्छा सध्याचे कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे यांनी श्री. कॉन्ट्रॅक्टर यांना बोलून दाखविली. बाबांचे एकनिष्ठ भक्त असलेले श्री. कॉन्ट्रॅक्टर यांनी हा जणू बाबांचा प्रसादच आहे व तो ग्रहण करणे आपले कर्तव्य आहे असे समजून, दुसरा मजला वाढविण्यास लागणारी रक्कम रु. २,१०,०००/– संस्थानला दिली.

मंगलकार्यालयाचे काम झपाट्याने सुरू झाले, व दि. ३०–१–८२ रोजी त्याचे उद्घाटन करण्यात आले. योगायोगाची गोष्ट अशी की यावेळी श्री. कॉन्ट्रॅक्टर हे

जातीने उपस्थीत असल्यामुळे त्यांचे हस्ते हा उद्‌घाटन सोहळा मोठ्या उत्साहाने पार पडला. श्री. कॉन्ट्रॅक्टर यांचे सध्याचे वास्तव्य सिक्कीम येथे असून तेथे त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या Distillaries आहेत. भूतान व सिक्कीम येथील एक धनिक म्हणून ते ओळखले जातात. बाबांचे एकनिष्ठ भक्त असलेले श्री कॉन्ट्रॅक्टर हे अत्यंत शांत स्वभावाचे व साधे आहेत. शिर्डीस आल्यानंतर बाबांचे दर्शन घेणे, व जास्तीत जास्त वेळ बाबांच्या दरबारी रहाणे हेच आपले कर्तव्य ते समजतात. सर्व कर्मचारी वर्गाशी ते अत्यंत प्रेमाने वागतात.

श्री साईबाबा संस्थानचे मंगल कार्यालय म्हणजे शिर्डीसारख्या ग्रामीण भागातील एक उत्कृष्ट वास्तू आहे. आजूबाजूच्या परिसरातील सर्व लोकांसाठी ही एक उत्कृष्ट सोय झालेली आहे. रु. २५०/– अनामत रक्कम घेऊन मंगलकार्यालय, भाड्याने देण्यात येते. तळमजल्याचे भाडे रु. १५०/– व पहिल्या मजल्याचे भाडे रु. ७५/– अशा प्रकारे अत्यंत कमी दरात ग्रामीण विभागातील लोकांच्या अडचणी लक्षात घेऊन, भाड्याची आकारणी करण्यात संस्थान अद्याप यशस्वी ठरले आहे. ही एक अभिमानाची गोष्ट आहे.

## निवृत्त संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे निधन

निवृत्त संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री हे वृद्धापकाळामुळे वयाच्या ७१ व्या वर्षी ३–२–८२ रोजी नगर येथे साईचरणी विलीन झाले.

श्री. जोशी यांचा जन्म बीड जिल्ह्यातील मोरगावी १४ ऑक्टोबर १९११ रोजी झाला. त्यांनी २५ वर्षे पंढरपूर येथे नोकरी केली याच काळात त्यांनी तबला, गायन, वादन व कीर्तनाचे ज्ञान मिळवले व तेथेच 'काव्यतीर्थ' ही संस्कृतातील उच्च पदवी संपादन केली. तेव्हापासून ते शास्त्री बुवा म्हणून ओळखले जात असत. २५ ते ३४ वर्षे पर्यंत त्यांनी मराठवाड्यात निरनिराळ्या ठिकाणी कीर्तने व प्रवचने केली.

१९४५ साली कोपरगाव येथे श्रीमान गोकुळचंद विद्यालयात ते संस्कृत शिक्षक म्हणून आले. ८ जून १९७० रोजी ते कोपरगाव येथून सेवानिवृत्त झाले.

१ जून १९७१ पासून ते संस्थान गवई म्हणून नोकरीस राहिले त्यानी साईसेवा मनोभावे केली.

त्यांना संतवाङ्मय व पुराणे वाचनाचा छंद होता. त्यांचे ते आवडीने वाचन करीत.

ईश्वर मृतात्म्यास सद्‌गति देवो.

॥ ॐ श्रीसाई ॥

जना द्यावे उत्तमोत्तम सुविचारी । हेची श्रीसाई संतोऽऽष मानी मुंबईत बृहन्मुंबईत । उपनगरांत । नव्या मुंबईत कोठेही ५०० ग्रॅम्स उत्तमोत्तम, डायरेक्ट मळ्यातील चहा फक्त रु. ११/– ला सर्व साईभक्तांस ह्या साईभक्ताकडून घरपोच अनमोल सुसेवा कॉफी सुद्धा.

बाहेरगावी देखील कोठेही पोस्टाने पाठवितो. त्याकरिता आगाऊ रु. १५/– पाठवावे...लिहा / भेटा.

# पाटणे चहा व कॉफी

( चहा कॉफीचे डायरेक्ट इम्पोर्टर्स आणि घाऊक व किरकोळ व्यापारी )

पोस्ट बॉक्स ६४९० नवरोजी बिल्डिंग

जागृती हौसिंग सोसायटी इस्टेट, लेडी जमशेटजी रोड,

माटुंगा ( प. रेल्वे ) मुंबई नं. ४०००१६.

टेलीफोन : ४६२३५९ सेल्स-ऑफीस / ५७१९९१ ( निवास )

ता. क. शनि / रवि / रजेचे दिवशी बंद.

टाईम : ११–३० ते ८–३०

सदस्य :– मराठी व्यापारी मित्रमंडळ, दादर, मुंबई नं. ४०००२८

---

# श्रीसाईभक्तांसाठी सुवर्ण संधी

अत्यंत रसाळ व मधुर शब्दात लिहिलेले

**श्रीसाईबाबांच्या पन्नास गोष्टी**

**ले. साईभक्त – के. ए. भोजने**

मुखपृष्ठावर श्रीसाईंचे दुर्मिळ चित्र.

अंतरंग श्रीसाईंचे जीवन प्रसंग स्तोत्रे, अष्टोत्तर शतक नामावलीसह.

**मुल्य रुपये ७ फक्त**

सर्व बुकसेलर्सकडे उपलब्ध : प्रती अत्यंत मर्यादित

प्रकाशक :– **श्री ललित प्रकाशन**

कर्नाटक हाऊस चिराबाजार मुंबई ४००००२

**फोन नं. ३८ ४९ ६४**

वितरण व्यवस्था :– **हळबे एजन्सी**

क्रांतीवीर राजगुरु मार्ग, गिरगाव मुंबई ४००००४

# शिरडी-वृत्त माहे जानेवारी सन १९८२

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन :–** १) ह. भ. प. श्री. किसन रामभाऊ बोरावके नांदगाव
**व प्रवचन** २) ह. भ. प. सौ. सुलोचनाबाई इनामदार, सातारा.
३) ह. भ. प. जाधव गुरुजी, शिर्डी यांचे प्रवचन.
४) ह. भ. प. उत्तमराव जोशी, बोरगाव.
५) ह. भ. प. डॉ. श्री. दि. परचुरे, मुंबई यांचे प्रवचन.

**भजन, गायन, वादन, वगैरे :–** १) श्री. भोलानाथ रामनाथ समेळ, मुंबई २) श्री. हेमचंद्र दत्तोबा तावडे, मुंबई. ३) श्रीराम भजनी मंडळ, पैठण. ४) श्रीमती रेणूकौशीक, सिमला. ५) श्री. उज्जपसंग कीर्तन मंडळ, दिल्ली. ६) श्री. एम. एस. केसकर, मुंबई. ७) श्री. महाडगुद, मुंबई. ८) श्री. वसंतराव फुलंब्रीकर, बांद्रा. ९) श्री. सुपाजी रोडाजी चव्हाटे, चांदणी. १०) श्रीसाईबाबा सेंटर वुलवर्मा. ११) श्री ऐरच्या अंकलेश्वरीया, मुंबई. १२) श्री. मोहन मुकुंद म्हात्रे, वसई. १३) सुपरस्टार ऑर्केस्ट्रा लालबाग मुंबई, श्री लफासीया १४) श्री. एकनाथ मिराशी १५) श्री. समर्थ आयरे १६) श्री. अविनाश पेडणेकर १७) श्री. मनोहर वाळवे, १८) श्री. प्रदिप सावजी, १९) श्री. चंद्रकांत तिळवे, २०) श्री. सुर्यकांत तिळवे, २१) श्री. सिद्धार्थ पांचाळ, २२) श्री. दिपक तांबे, २३) श्री. दिपक पांचाळ, २४) श्री. जगदिश जाधव २५) श्री. बाबू शिरवडकर, २६) श्री. अरुण शिर्के, २७) श्री. राजन पवार, २८) श्री. नारायण कुशे, २९) कु. नंदा गोवेकर, ३०) कु. मीना कंदोई, ३१) श्री. अजय कावले, ३२) श्री. शरद पांचाळ, ३३) श्री. सुधीर मालवणकर, ३४) श्री. श्रीधर नेवरेकर, ३५) श्री. हरीश्चंद्र नेवरेकर, ३६) श्री. विजय मिराशी, ३७) श्री. हरीश्चंद्र माने, ३८) ए. एस. सावंत, ३९) श्री. संजय आयरे, ४०) श्री. नरेंद्र सिद्ध, ४१) श्री. बाळकृष्ण मिराशी, ४२) श्री. ध्वजाधारी बॅण्डपथक (सेवा मंडळ) रमेश तुकाराम घनावडे मुंबई. ४३) सौ. नीला रविंद्र, (भिडे) मुंबई. ४४) सौ. कुंदा जोशी, इंदौर. ४५) श्री. भजनीबुवा शं. गोलतकर मुंबई. ४६) श्री. एन. रेळेकर, कोल्हापूर. ४७) श्री. प्रभाकर दिनकर पांचाळ, मुंबई. ४८) सौ. सुलोचना इनामदार, सातारा. ४९) श्री. साईनाथ भजनी मंडळ, हैद्राबाद. ५०) श्री. रामभजन समाज, सुहंकल. ५१) श्री. माणिक बापूराव काळे, आरवी. ५२) श्री. विकास नारायणराव काळे, वर्धा. ५३) श्री. श्याम गुंडावार, वर्धा. ५४) श्री. प्रकाश देवधरे (भिडी) वर्धा. ५५) श्री. एम. एन. पद्माराव, हैद्राबाद. ५६) श्रीराम सातर्डेकर, मुंबई. ५७) श्रीसाईलीला

लेखक कवी कलाकार श्री अनिलकुमार लुतडे वर्धा. ५८) श्री. प्रकाश कर्पे, इंदूर. ५९) श्री. सूर्यकांत दळवी, घाटकोपर. ६०) श्री. रघुनाथ सांडभोर, पुणे. ६१) श्री. दौ. वि. सूर्यवंशी, नवापूर. ६२) श्री. दत्तात्रय महादेव मोरे, पुणे. ६३) श्री. हसमुख ओंकार पाटील, नवापूर. ६४) श्री. राहूल खानविलकर, लोणावळा. ६५) श्री. रमेश डी. चव्हाण, नवापूर. ६६) श्री. नानासाहेब रासने, पुणे. ६७) श्रीमती श्री शहाणे मुंबई. ६८) लीलाताई गुजराथी, शिर्डी. ६९) श्री. आशिष विजय हजारे, मुंबई. ७०) श्री. डी. बी. जगत्पुरीया शिरुड. ७१) डॉ. मालती रहाटे, भंडारा. ७२) डॉ. सुमती खानविलकर, लोणावळा. ७३) श्री. आप्पा सामंत मुंबई. ७४) श्री. शांतीलाल दवे. ७५) डॉ. इंदूताई नाईक, लोणावळा. ७६) सौ. शशीकला रेवणकर, अंबरनाथ. ७७) श्री. बापूसाहेब निरखे, इंदूर. ७८) सौ. लीलाताई मराठे, धुळे. ७९) सौ. उषा कुलकर्णी, उस्मानाबाद. ८०) श्री. मधूकर मंडलीक, नवापूर. ८१) श्री. किशोर जीवनदास पुरोहीत, ८२) कु. प्रशांत हसमुख पाटील, नवापूर. ८२) कुमूद टिळक, घाटकोपर. ८४) सौ. शांता आंबाजी सरोदे, ८५) प्रभाकर गो. कोळमकर, ८६) मनीषा प्र. कोळमकर, ८७) यामिनी प्र. कोळमकर, ८८) दीपा प्र. कोळमकर, ८९) श्री. भीकू जोशी, पुणे. ९०) श्री. जगन्नाथ नारायण कुलकर्णी, पुणे. ९१) श्री. डी. बी. पोतनीस, पिंपरी. ९२) श्री. विजय हजारे, मुंबई. ९३) श्री. डी. आर. खडके, मुंबई. ९४) प्रो. ए. पी. त्रिपाठी, बैतूल. ९५) प्रो. एच. बी. महाले, बैतूल. ९६) जुगल किशोर पूरी, चंदीगड, ९७) श्री. आर. आर. वर्मा, बैतूल. ९८) श्री. ग. रा. पालकर, मुंबई. ९९) श्री. नागेश मोगलाईकर, धुळे. १००) श्री. रमाकांत पंडीत, मुंबई. १०१) श्री. मधूकर वखारे, मुंबई १०२) श्री. पटवारी, बिदर. १०३) श्री. राधाकृष्ण गुप्ता चेतन डोंबीवली. १०४) विनीत स्वादिया, मुंबई. १०५) श्री. राजा रावळ, मुंबई. १०६) श्री. विलास पडवळ, मुंबई. १०७) श्री. भालचंद्र पोटकुळे, मुंब्रा. १०८) श्री. सदाशिव व्यंकटेश कुलकर्णी, कोल्हापूर.

**प्रजासत्ताक दिन**—दि. २६ जानेवारी १९८२ रोजी सकाळी ७–३० वा. मंदिराचे गच्चीवर, माननीय रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांचे शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. गावातील प्रतिष्ठीत नागरीक, श्रींच्या दर्शनासाठी आलेले साईभक्त, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थीनी, संस्थान कर्मचारी, सेवेकरी, बॅण्डपथक, होमगार्ड्स, पोलीस उपस्थीत होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. उपस्थिताना चहापान दिल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

**बक्षिस समारंभ**—सन १९८१ सालाकरिता उत्कृष्ठ स्वच्छता कामगार म्हणून, सौ. सुशिलाबाई शंकरराव गोडखिंडी पारितोषिक (चांदीचे पदक) श्री.

मिका उखा शाऊत, कायम स्वच्छता कामगार श्री साईबाबा संस्थान शिर्डी, याना मा. काकरे साहेब यांचे शुभहस्ते देणेत आले.

**हवापाणी**—शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवा थंड असते.

★

We don't cxaggerate! We only reproduce what the readers write to us about our Novels on SAI BABA.

**"A MISSION DIVINE!"** Rs. 45/-

**"मशिदीत प्रगटला परमेश्वर!"** Rs. 36/-

No V. P. P. Postage for English-Marathi 4·50 each Shri R. S. Iyer, Principal, Govt. Post Graduate College, Panna, M. P. Writes: "I have gone through your book 'A Missiou Divine'. It's simply marvellous. I have read almost every book available in English and Hindi on Shirdi Sai Baba, but yours is unique in detail, exposition and manner of presentation. Without Baba's grace it's difficult to Write such a book..."

**PRASHANTI PRAKASHAN, 5 Vasant Apartments, 47 Kastur Park, Shimpoli Road, Borivali (W), Bombay 400 092.**

Soon in beautiful HINDI too!

**'प्रगटे मस्जिद में साई भगवान!'**